पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ●वर्ष १६ ●अंक ८ ●मंगळवार, दि. १४ जुलै २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 | Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 | Web. http://epaper:citynewssuperfast.com

**सुविचार**

जीवनात त्यालाच महत्त्व द्या
ज्याला तुमची किंमत कळते

सिटी न्यूज सुपरफास्ट
अकोट शहरात
अंक मिळण्यासाठी व जाहिराती साठी
संपर्क
राजेश सोळंके
विशेष प्रतिनिधी
+91 8888299934

## » थोडक्यात

### एटीएसची मोठी कारवाई!

पुणे : महाराष्ट्र एटीएसने अनेक मोठ्या शहरांमध्ये कारवाई सुरू केली आहे. महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने पुणे शहर, पुणे ग्रामीण आणि पिंपरी-चिंचवड परिसरात मोठी छापेमारी सुरू केली आहे. पाकिस्तानी गँगस्टर शहजाद भट्टी आणि त्याच्या कथित आयएसआय संपर्कांच्या अनुषंगाने ६० हून अधिक संशयित व्यक्तींवर एटीएसची नजर असून, त्यांच्या घरांवर एकाचवेळी छापे टाकण्यात आले आहेत. प्राथमिक माहितीनुसार, आयएसआयकडून शहजाद भट्टीच्या माध्यमातून भारतातील काही तरुणांना देशविरोधी कारवायांसाठी प्रवृत्त करण्याचा प्रयत्न होत असल्याचा एटीएसला संशय आहे.

---

### ऑनलाइन परीक्षेवरून एमपीएससीमध्ये अंतर्गत मतभेद!

नागपूर : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) पूर्व परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्याचा निर्णय मागे घ्यावा, यासाठी राज्यभर आंदोलन सुरू आहेत. अनेक राजकीय पुढाऱ्यांकडून या निर्णयाला विरोध होत असतानाच ऑनलाईन परीक्षेच्या निर्णयावरून आयोगामध्ये अंतर्गत मतभेद असल्याची माहिती गुप्त सूत्रांकडून मिळाली आहे. त्यामुळे अखेर राज्य सरकारी या प्रकरणात मध्यस्थी करून योग्य तो निर्णय घेण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

---

### ‘ऑपरेशन टायगर’ सुरूच राहणार : मंत्री उदय सामंत

**कुडाळ** : पक्षाचा विस्तार करण्यासाठी सुरू केलेले 'टायगर ऑपरेशन' कधीही बंद होणार नाही. आता मुंबई महानगरपालिकेचे नगरसेवक, माजी खासदार आणि माजी आमदार पक्षाच्या रांगेत आहेत, असा दावा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केला. कुडाळ येथे शिंदेसेनेच्या कुडाळ-मालवण विधानसभा मतदारसंघाच्या बीएलए व पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला आमदार दीपक केसरकर, आमदार नीलेश राणे, जिल्हाप्रमुख दत्ता सामंत, संजू परब, संपर्कप्रमुख बाळा चिंदरकर यांच्यासह कुडाळ, मालवण व देवगडचे नगराध्यक्ष आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# देवाभाऊंच्या सरकारचे अपयश !

**1** शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसणे सुरु; कृषी अधिकारी झोपले होते काय ?

**2** पंचनामा न करता दोन बियाणे कंपन्यांवर गुन्हे दाखल, इतरांचे काय?

**3** कृषी विभागाचे केवळ कागद काळे करणे सुरु, उपाययोजना शून्य !

प्रतिनिधी १४ जुलै

अकोला : राज्यात 'शासन आपल्या दारी'च्या गप्पा मारल्या जात असताना, प्रत्यक्षात मात्र बोगस बियाणे कंपन्या थेट शेतकऱ्यांच्या घरात घुसून दरोडा टाकत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. बिजोत्पादन प्रमाणपत्रांचा काळाधंदा, बियाणे क्षेत्रात फोफावलेल्या बोगस कंपन्या आणि काही लाचखोर कृषी अधिकाऱ्यांची या कंपन्यांसोबत असलेली उघड युती यामुळे राज्यातील देवाभाऊंच्या सरकारची अब्रू चव्हाट्यावर आली आहे.
कृषी विभागाच्या कमालीच्या निष्काळजीपणामुळे आज अकोला जिल्ह्यातील आणि पर्यायाने संपूर्ण राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकरी देशोधडीला लागला आहे, अशी ओरड शेतकऱ्यांमध्ये आहे राज्यातील 'देवाभाऊंचे सरकार' जर खरोखरच शेतकरी हिताचे असेल, तर त्यांनी या भ्रष्ट अधिकाऱ्यांची आणि बोगस कंपन्यांच्या संचालकांना थेट तुरुंगात पाठवावे, अन्यथा शेतकरी या सरकारला कधीही माफ करणार नाही !



### घरचे सोयाबीन 'उत्तम'

महागड्या कंपन्यांचे बियाणे विकत घेऊन ते शेतात पेरल्यानंतर शेतकऱ्यांच्या पदरी केवळ निराशा आली. शेतातून कोंबच बाहेर आले नाहीत. आश्चर्य म्हणजे, ज्या शेतकऱ्यांनी घरी स्वतः तयार केलेले पारंपरिक सोयाबीन पेरले होते, त्याची उगवण अत्यंत उत्तम झाली आहे. यावरून कंपन्यांनी शेतकऱ्यांच्या माथी केवळ बोगस कचरा मारल्याचे स्पष्ट सिद्ध होते. कृषी विभाग आणि बियाणे उगवण क्षमता तपासणाऱ्या एजन्सीच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे आज हजारो शेतकरी दुबार पेरणीच्या संकटात सापडले आहेत.

### सोयाबीन सॅम्पलचे रिपोर्ट लपवून मोठा घोळ !

शेतकऱ्यांनी पेरणी करण्यापूर्वी बियाण्यांच्या उगवण क्षमतेची तपासणी होणे अनिवार्य असते. १ मे ते ३१ मे दरम्यान बियाण्यांची सॅम्पल तपासणी पूर्ण करणे भविष्यासाठी आवश्यक आहे. मात्र, कृषी विभागाने या अत्यंत महत्त्वाच्या कामाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. जेव्हा बियाण्यांचे सॅम्पल लॅबमध्ये 'नापास' (फेल) झाले होते, तेव्हा कृषी अधिकाऱ्यांनी या कंपन्यांची विक्री का थांबवली नाही ? सॅम्पलमध्ये उगवण क्षमता नसतानाही या बोगस बियाणे कंपन्यांना बाजारात बियाणे विकण्याचे परवाने कोणी आणि कशाच्या जोरावर दिले ?. या संपूर्ण घोळात बियाणे कंपन्या आणि कृषी अधिकाऱ्यांचे लागेबांधे उघड झाले असून, कृषी अधिकाऱ्यांचे ई-मेल आणि मोबाईल चॅट्स तपासल्यास भ्रष्टाचाराचे मोठे रॅकेट उघडकीस येऊ शकते. ज्या बियाणे कंपन्यांचे सॅम्पल फेल झाले आहेत, त्यांना तातडीने 'ब्लॅकलिस्ट' करून पुढील वर्षी त्यांच्या विक्री परवान्यांवर कायमची बंदी घालावी.

### चौकशी कधी होणार ?

केवळ कागदी घोडे नाचवून आणि कार्यालयात एसीमध्ये बसून अहवाल बनवणाऱ्या कृषी अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे आज बळीराजा हवालदिल झाला आहे. सॅम्पल रिपोर्ट दाबून ठेवणाऱ्या दोषी कृषी अधिकाऱ्यांवर आणि बियाणे उगवण क्षमता तपासणाऱ्या प्रयोगशाळा/एजन्सींवर जोपर्यंत फौजदारी गुन्हे दाखल होत नाहीत, तोपर्यंत शेतकऱ्यांना न्याय मिळणार नाही. यामध्ये प्रत्येक पंचायत समिती कृषी अधिकारी,जिल्हा परिषद कृषी विभाग, तेथील मोहीम अधिकारी यांच्या कडे या संदर्भातील महत्वाची जबाबदारी शासनाने दिलेली असते. जिल्हा परिषद कृषी विकास अधिकारी यांचे खासकरून नमुने काढण्याचे काम असते त्यांनी किती दिवे लावले याचा ही शोध घ्यावा.



### पंचनामा न करता गुन्हे दाखल; हा केवळ 'फार्स'?

अकोला जिल्ह्यात बोगस बियाण्यांच्या तब्बल १ हजार ७२२ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, तर तपासणीत तब्बल १८३ नमुने (सॅम्पल्स) अप्रमाणित (फेल) आढळले आहेत. तरीही, कृषी विभागाने केवळ दोन बियाणे कंपन्यांवर अत्यंत घाईघाईत गुन्हे दाखल केले. बियाणे न उगवलेल्या शेतांचे प्रत्यक्ष पंचनामे न करताच घाईघाईत गुन्हे दाखल करण्याचा अजब कारभार कृषी विभागाने केला आहे. पंचनामा नसताना हे गुन्हे न्यायालयात टिकतील कसे ?. सॅम्पल्स चे कागदपत्रे या गुन्ह्यात का दिले गेले नाहीत. जिल्ह्यात जवळपास १० कंपन्यांच्या सोयाबीन बियाण्यांची विक्री सुरू होती. मग केवळ दोनच कंपन्यांवर कारवाई का? उरलेल्या कंपन्यांना कृषी अधिकाऱ्यांनी अभय का दिले ?

# अकोला पश्चिम निवडणूक याचिका उच्च न्यायालयाचा निर्णय!

## दुबार मतदानाचा मुद्दा वैध ठरवत साजिद खान यांना धक्का बसणार का

प्रतिनिधी १४ जुलै

**नागपूर:** मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने अकोला पश्चिम विधानसभा निवडणूक याचिकेशी संबंधित विविध अर्जांवर महत्त्वपूर्ण आदेश जारी केले आहेत. न्यायमूर्ती अनिल एल. पानसरे यांच्या एकलपीठाने विजय कमलकिशोर अग्रवाल यांच्या याचिकेवरील सुनावणी दरम्यान अकोला जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना सर्व संबंधित निवडणूक कागदपत्रे आणि रेकॉर्ड सुरक्षित ठेवण्याचे आदेश कायम केले आहेत. तसेच, दोन वेगवेगळ्या मतदारसंघांत दुबार मतदान झाल्याचा आक्षेप घेणारी याचिका कायद्यानुसार वैध मानत, न्यायालयाने विरोधी उमेदवाराचा आक्षेप फेटाळून लावला आहे.

**नेमके प्रकरण काय ?**

अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीच्या निकालाला आव्हान देणारी निवडणूक याचिका भाजप उमदेवार विजय कमलकिशोर अग्रवाल यांनी दाखल केली आहे. या निवडणुकीत निवडून आलेले काँग्रेस नेते व आमदार साजिद खान पठाण यांच्या विरोधात ही याचिका आहे. अग्रवाल यांनी दाखल केलेल्या याचिकेत प्रामुख्याने खालील गंभीर मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत.

**१,१२५ मतदारांची नावे दोन्हीकडे**

अकोला पश्चिम (मतदारसंघ क्र. ३०) आणि बाळापूर (मतदारसंघ क्र. २९) या दोन्ही मतदारसंघांच्या मतदार यादीत किमान १,१२५ मतदारांची नावे आणि छायाचित्रे



सारखीच आढळली आहेत. या मतदारांनी संबंधित पोलीस ठाण्यात दिलेल्या जबाबांनुसार दोन्ही ठिकाणी मतदान केले असून, अकोला पश्चिममध्ये त्यांनी साजिद खान पठाण यांच्या बाजूने मतदान केल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे.

**अकोला पश्चिम व बाळापूरात ३,६१४ मतदारांचे दुबार मतदान**

२० नोव्हेंबर २०२४ रोजी झालेल्या मतदानात सुमारे ३,६१४ मतदारांनी एकापेक्षा जास्त वेळा मतदान केले, ज्यामुळे लोकप्रतिनिधीत्व कायदा, १९५१ च्या कलम ६२(४) अंतर्गत ही निवडणूक अवैध ठरते, असा युक्तिवाद करण्यात आला आहे. लोकप्रतिनिधीत्व कायदा, १९५१ च्या कलम ६२(३) नुसार कोणत्याही व्यक्तीला एकापेक्षा जास्त मतदारसंघात मतदान करण्याचा अधिकार नाही. जर एखाद्याने तसे केले, तर त्याची दोन्हीकडील मते अवैध ठरतात. साजिद खान पठाण यांच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ जे. टी. गिल्डा यांनी कोर्टात असा युक्तिवाद केला की, निवडणूक याचिकेद्वारे मतदार यादीच्या वैधतेवर प्रश्नचिन्हे उपस्थित केले जाऊ शकत नाही आणि सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निकालांनुसार असा आक्षेप घेण्यास कायद्याने बंदी आहे. न्यायाधीश अनिल एल. पानसरे यांनी हा युक्तिवाद फेटाळून लावला. न्यायालयाने स्पष्ट केले की, ‘याचिकाकर्त्याने मतदार यादीला आव्हान दिलेले नाही, तर एकाच मतदाराने दोन वेगवेगळ्या मतदारसंघात दोनदा मतदान केल्याच्या बेकायदेशीर कृत्यावर बोट ठेवले आहे. हा आक्षेप कायद्याच्या चौकटीत पूर्णपणे वैध आहे.’ त्यामुळे साजिद खान पठाण यांच्या बाजूने दाखल करण्यात आलेला अर्ज न्यायालयाने फेटाळून लावला.

### निवडणूक रेकॉर्ड सुरक्षित ठेवण्याचे आदेश

यापूर्वी १९ सप्टेंबर २०२५ रोजी न्यायालयाने अकोल्याच्या जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना या निवडणुकीशी संबंधित सर्व कागदपत्रे आणि रेकॉर्ड सुरक्षित ठेवण्याचे अंतरिम आदेश दिले होते. १० जुलै २०२६ रोजी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने हा अंतरिम आदेश अंतिम केला आहे, कारण हे रेकॉर्ड या प्रकरणाचा निकाल लावण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. पुढील सुनावणीया प्रकरणातील मुख्य निवडणूक याचिकेवर आता मुद्दे निश्चित करण्यासाठी न्यायालयाने पुढील सुनावणी ३१ जुलै २०२६ रोजी निश्चित केली आहे. या सुनावणीत याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. रोहन व्ही. मालवीय आणि ॲड. एच. व्ही. ठाकूर यांनी बाजू मांडली.

# शरद पवार गट एनडीए सोबत जाणार!

**खासदारांची मते घेतली जाणून**

प्रतिनिधी १४ जुलै

**मुंबई :** भाजप प्रणीत एनडीएसोबत जाण्याची तयारी राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाने चालविली असून, त्यासंदर्भात पक्षाच्या दहापैकी नऊ आमदारांची मते ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी जाणून घेतली आहेत. पक्षाच्या खासदारांशीही ते बोलले असून पक्षाध्यक्ष शरद पवार यांच्याशी बोलून लवकरच काय तो निर्णय करू, असे पाटील यांनी त्यांना सांगितल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली. पावसाळी अधिवेशनात शेवटच्या टप्प्यात आमदारांची बैठक विधान भवनातच झाली. या बैठकीला रोहित पवार सोडून पक्षाचे नऊ विधानसभा सदस्य हजर होते. या बैठकीत आधी पाटील यांनी सर्व आमदारांची मते जाणून घेतली. त्यावर बहुतेकांनी भाजपसोबत जाण्याचा आग्रह धरला, अशी माहिती आहे. राष्ट्रवादीच्या अजित पवार गटात विलीन होण्यापेक्षा आपल्या पक्षाने थेट भाजप प्रणीत एनडीएचा घटक पक्ष बनावे, अशी सूचना आमदारांनी केली. मतदारसंघातील विकासकामे करण्यासाठी निधी हवा असेल आणि २०२९ मध्ये चांगले यश मिळवायचे असेल तर भाजपसोबत आणि पर्यायाने एनडीएसोबत जाणे आवश्यक असल्याचे मत बहुतेक आमदारांनी त्या बैठकीत व्यक्त केल्याचे समजते. अशी बैठक झाल्याच्या वृत्ताला नाव न देण्याच्या अटीवर पक्षाच्या तीन आमदारांनी दुजोरा दिला.



# सुनेत्रा पवार यांना पक्षातूनच विरोध!

## सुधारणात्मक उपायांची गरज, प्रफुल पटेल यांचं उघड भाष्य

प्रतिनिधी १४ जुलै

**मुंबई** : अजित पवार यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांच्याकडे नेतृत्व गेलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील खदखद सोमवारी उघड झाली. पक्षाचे राष्ट्रीय सचिव सच्चिदानंद सिंह यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडीला आव्हान देणारी कायदेशीर नोटीस बजावली. तर अजित पवार यांच्या निधनानंतर पक्षात निर्माण झालेली पोकळी आणि 'सुधारणात्मक उपाययोजनांची गरज' यांबाबत पक्षाचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनीही सोमवारी उघड भाष्य केले. अजित पवार यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरुन काढणे सोपे काम नाही. पक्षात काही सुधारणात्मक पावले उचलण्याची गरज आहे, असे प्रफुल पटेल यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना केले. राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत समस्यांची पटेलांनी जाहीर कबुली देण्याची ही पहिलीच वेळ मानली जाते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाल्यानंतर पक्षात नेतृत्वाबाबत मोठी उलथापालथ झाली. त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी पक्षाची धुरा हाती घेतल्यानंतर, प्रफुल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचे मोठे आव्हान मानले गेले.

### प्रफुल्ल पटेल तात्पुरते अध्यक्ष असावेत

पक्षाच्या १७ फेब्रुवारीच्या नोंदींनुसार अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल हे तात्पुरते राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून काम पाहतील, असे निश्चित करण्यात आले होते, असे त्या पत्रात म्हटले आहे. तसेच १६ फेब्रुवारी रोजी पक्षाच्या घटनेत सुधारणा करण्यात आल्याचेही त्यात नमूद केले आहे.

### राष्ट्रीय अधिवेशनाच्या वैधतेवरच प्रश्नचिन्ह

घटनेनुसार विहित कार्यपद्धतीचे पालन करण्याऐवजी सरचिटणीस ब्रिजमोहन श्रीवास्तव यांनी १८ फेब्रुवारी रोजी परस्पर एक ठराव मंजूर केला; ज्याद्वारे राष्ट्रीय अधिवेशन बोलावणे आणि पक्षाच्या कायमस्वरुपी अध्यक्षाची निवड करण्यासाठी निवडणूक प्रक्रिया सुरु करणे असे निर्णय घेण्यात आले, असे सिंग यांनी नोटिशीत म्हटले आहे. मात्र, राष्ट्रीय अधिवेशन बोलावण्याचा अधिकार केवळ पटेल यांच्याकडेच होता, असेही त्यात स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे, सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड करण्यात आली, त्या २६ फेब्रुवारी रोजी एनएससीआय क्लबमध्ये झालेल्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या वैधतेवरच या पत्राद्वारे प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे.

# मी राजीनामा देणार नाही : स्वामी गोविंददेव गिरी महाराज

प्रतिनिधी १४ जुलै

**पुणे** : मी राजीनामा देणार आहे. असा विचारही माझ्या मनात नाही. ट्रस्ट सोबत उभे राहण्याची हीच वेळ असल्याचे श्रीराम मंदिर ट्रस्ट अयोध्याचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी सांगितले आहे.
स्वामी गोविंददेव गिरी महाराज म्हणाले, काल सगळीकडे माझ्या राजीनाम्याची बातमी पसरली होती. मी असं कधीही म्हटलं नाही. मी छत्रपती शिवाजी महाराजांचा अनुयायी आहे. मैदान सोडून पळणारा नाही. माझ्या नावावर संपूर्ण जीवनात एकही विट नाही, काहीही संपत्ती माझ्या नावावर नाही. फक्त एक बँक अकाउंट आहे. कोषाध्यक्ष पदाचा राजीनामा मी द्यावा असे मी कधी मनातही आणले नाही. आलेल्या बातम्या खोट्या आहेत, त्या खोडसाळपणे पसरवल्या



आहेत. संघर्षावेळी ट्रस्ट सोबत उभा राहणं महत्वाचं आहे. एसआयटीच्या चौकशीवर मी समाधानी आहे.
चंपातराय यांनी जो राजीनामा दिला आहे, तो त्यांचा हलगर्जीपणामुळे दिलेला आहे, त्यांनी दिलेला राजीनामा हा स्व:च्छेने दिलेला आहे. जमाखर्चाची जबाबदारी मी स्वीकारत आहे. मी कुठं प्रभाव टाकत नाही. कुणाला ही फोन केलेला नाही. गुन्हेगार कुणीही असो, त्यांना पकडले पाहिजे आणि कठोर कारवाई केली पाहिजे. एसबीआय बँकेने त्यांचे निरीक्षक ठेवायला हवे होते.

# राज्यातील शाळांमध्ये आता आणखी एका ॲपची भर!

## सप्टेंबरपर्यंत करावी लागेल अंमलबजावणी, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचा आदेश

प्रतिनिधी १४ जुलै

**पुणे** : राज्यातील सर्व महापालिका, जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रशस्त ॲप २.० ची (पूर्वमूल्यांकन सर्वसमावेशक तपासणी साधन) प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि महापालिका आयुक्तांना दिल्या आहेत.
‘प्रशस्त ॲप २.०’ हे शाळांतील विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांची सुरुवातीच्या टप्प्यात ओळख पटवण्यासाठी तयार करण्यात आले असून, सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांची तपासणी करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे सहसंचालक देविदास कुलाळ यांनी याबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. केंद्र सरकारच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रशस्त ॲप २.० आता यूडायस प्लस प्रणालीशी जोडण्यात आले आहे. त्यामुळे शाळा, विद्यार्थी, वर्गशिक्षक, मुख्याध्यापक आणि विशेष शिक्षक यांची माहिती एकाच प्रणालीत उपलब्ध होणार आहे. विद्यार्थ्यांच्या माहितीची स्वयंचलित जोडणी, भूमिकेनुसार प्रवेश, जबाबदाऱ्यांचे वाटप आणि तपासणीच्या कामावर प्रभावी देखरेख ठेवणे शक्य होणार आहे.



### ‘प्रशस्त २.०’ अंमलबजावणीचे वेळापत्रक

**जून ते ऑगस्ट** : शिक्षक व मुख्याध्यापकांचे प्रशिक्षण आणि विद्यार्थ्यांचे प्राथमिक निरीक्षण.
**जून ते जुलै** : मुख्याध्यापकांचे लॉग-इन सक्रिय करणे.
**ऑगस्ट** : वर्गशिक्षक आणि विशेष शिक्षकांची ॲपमध्ये जोडणी.
**सप्टेंबर** : वर्गशिक्षकांकडून १०० टक्के विद्यार्थ्यांची तपासणी.
**ऑक्टोबर** : विशेष शिक्षकांकडून दुसऱ्या टप्प्यातील तपासणी.

### २१ प्रकारच्या दिव्यांगत्वाशी संबंधित तपासणीसाठी उपयुक्त ॲप

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अंतर्गत अधिसूचित २१ प्रकारच्या दिव्यांगत्वाशी संबंधित लक्षणांची प्राथमिक तपासणी करण्यासाठी हे ॲप उपयुक्त ठरते. त्यामुळे या ॲपच्या माध्यमातून शाळांतील सर्वच विद्यार्थ्यांची तपासणी करून विशेष मदतीची गरज असलेल्या विद्यार्थ्यांची ओळख लवकर पटून सर्वसमावेशक शिक्षणाचे नियोजन, उपाययोजना करता येतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

# 15 महसूल अधिकारी निलंबित!

## कलम 155चा गैरवापर केल्याने सरकारचा दणका

प्रतिनिधी १४ जुलै

**पुणे:** महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील कलम १५५चा गैरवापर केल्याप्रकरणी महसूल विभागाने आक्रमक पावले उचलून वाशिमचे उपजिल्हाधिकाऱ्यांसह राज्यातील १५ महसूल अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली आहे. या कारवाईमुळे महसूल विभागातील अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.
महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशानंतर संबंधित उपजिल्हाधिकारी, तहसीलदारांच्या निलंबनाचा आदेश काढला असून, महसूल प्रशासनातील नियमबाह्य निर्णय आणि अधिकारांच्या गैरवापराविरोधात सरकारने कारवाईचे धोरण स्वीकारल्याचा थेट संदेश देण्यात आला आहे. ‘कलम १५५’चा वापर केवळ शुद्धलेखनाच्या किंवा लिपिकीय चुका दुरुस्त करण्यासाठी करणे अपेक्षित असते. मात्र, अधिकाऱ्यांनी याचा गैरवापर करून मोठ्या प्रमाणावर जमिनींच्या मालकी हक्कात फेरफार केले. एकाची मालमत्ता दुसऱ्याच्या नावावर करण्याचे गंभीर प्रकार उघडकीस आले आहेत.




### निलंबित अधिकाऱ्यांमध्ये यांचा आहे समावेश

निलंबित अधिकाऱ्यांमध्ये वाशिमचे उपजिल्हाधिकारी संजय नागटिळक आणि गीता गायकवाड, जुन्नरचे तहसीलदार रवींद्र सबनीस, नागपूरचे उपजिल्हाधिकारी मधुसूदन बर्गे, धाराशिवचे भूसंपादन अधिकारी श्रीकांत पाटील, सोलापूरच्या विशेष दंडाधिकारी वैशाली वाघमारे, तहसीलदार एल. डी. शेख, तहसीलदार अभय चव्हाण, तहसीलदार रंजना वरहंडे, मंडलाधिकारी शरद गाडे, ग्राम महसूल अधिकारी संगीता लांडे, मंडलाधिकारी मल्लप्पा ढाणे,ग्राम महसूल अधिकारी सुजाता रच्चेवार यांचा समावेश आहे.

# सोनम वांगचूक यांच्या आंदोलनाबाबत जनता झोपेत

भारताच्या लोकशाही परंपरेत उपोषण हे केवळ आंदोलनाचे साधन नाही; ते सत्तेच्या विवेकाला दिलेली नैतिक साद असते. महात्मा गांधींपासून अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी उपोषणाचा मार्ग स्वीकारला, कारण त्यामागे हिंसा नव्हती, तर समाजाचे आणि सत्तेचे अंतःकरण जागे करण्याचा प्रयत्न होता. परंतु आज प्रश्न असा निर्माण झाला आहे की, जर सत्तेचे अंतःकरणच जागे होत नसेल, तर अशा त्यागाचे काय?



सोनम वांगचूक यांच्या उपोषणाने हाच प्रश्न देशासमोर उभा केला आहे. त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत असल्याच्या बातम्या समोर येत आहेत. वजन घटणे, रक्तदाब कमी होणे आणि आरोग्य धोक्याच्या दिशेने जाणे ही केवळ वैद्यकीय बाब नाही; ती लोकशाहीच्या संवेदनशीलतेची कसोटी आहे. कोणत्याही मतभेदांपेक्षा एका नागरिकाचा जीव अधिक मौल्यवान असतो. मात्र या संपूर्ण प्रकरणात सर्वाधिक वेदनादायी बाब म्हणजे समाजाचा वाढता उदासीनपणा. ज्या प्रश्नांसाठी एखादी व्यक्ती स्वतःचे आरोग्य आणि जीवन धोक्यात घालते, त्या प्रश्नाशी संबंधित समाजघटक जर शांत राहिला, तर त्या आंदोलनाची नैतिक ताकद कमी होत जाते. लोकशाहीमध्ये कोणतीही लढाई एका व्यक्तीची नसते; ती समाजाच्या सहभागानेच प्रभावी बनते. इतिहास साक्षी आहे की भारतातील अनेक परिवर्तनशील चळवळींमध्ये विद्यार्थ्यांनी निर्णायक भूमिका बजावली आहे. जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनात विद्यार्थ्यांनी देशभर जनमत जागवले. विद्यार्थी आंदोलनाने राज्याच्या राजकारणालाच नवे वळण दिले. स्वातंत्र्यलढ्यापासून भ्रष्टाचारविरोधी चळवळीपर्यंत विद्यार्थ्यांची ऊर्जा ही परिवर्तनाची प्रेरणा राहिली आहे. आज मात्र जनतेमध्ये युवकांमध्ये विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक प्रश्नांबाबतची अलिप्तता वाढत असल्याचे चित्र चिंताजनक आहे. याचा अर्थ असा नाही की प्रत्येक विद्यार्थी रस्त्यावर उतरायलाच हवा; परंतु लोकशाहीतील प्रश्नांविषयी जागरूकता, शांततापूर्ण समर्थन आणि सार्वजनिक चर्चेत सहभाग हीदेखील नागरिकांची जबाबदारी आहे. उद्याचा देश घडवणाऱ्या तरुणांनी जर सार्वजनिक प्रश्नांपासून पाठ फिरवली, तर लोकशाहीचा पाया कमकुवत होण्याचा धोका निर्माण होतो. या विषयात माध्यमे आणि राजकीय पक्षांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. कोणत्याही आंदोलनाचे मूल्य त्यामागील पक्ष, विचारधारा किंवा राजकीय सोय यावर ठरू नये. लोकहिताचा प्रश्न असेल, तर सत्ताधारी आणि विरोधक दोघांनीही त्याकडे गांभीर्याने पाहणे अपेक्षित असते.

लोकशाहीत संवाद हा संघर्षापेक्षा अधिक परिणामकारक मार्ग आहे. उपोषण हे अंतिम शस्त्र मानले जाते. त्याचा उद्देश स्वतःचे बलिदान देणे नसून समाज आणि शासनाला विचार करण्यास भाग पाडणे हा असतो. जर परिस्थिती अशी निर्माण होत असेल की उपोषणकर्त्याचा जीव धोक्यात येत आहे आणि संवादाची शक्यता कमी होत आहे, शासन उपोषणकर्त्याचा खून करण्यास तयार असताना जनता मात्र झोपेचा सोंग घेऊन बसलेली आहे की लोकशाहीसाठी सर्वात मोठी घातक घटना ठरू शकते. तर आंदोलनाच्या पुढील टप्प्याबाबत पुनर्विचार करणे हेही शहाणपणाचे लक्षण ठरू शकते. कारण कोणतीही चळवळ तिच्या नेतृत्वापेक्षा मोठी नसली, तरी नेतृत्व वाचले तरच लढा पुढे जाऊ शकतो.

आजचा प्रश्न केवळ सोनम वांगचूक यांचा नाही; तो भारतीय लोकशाहीच्या सामाजिक संवेदनशीलतेचा आहे. मतभेद असू शकतात, भूमिका वेगवेगळ्या असू शकतात; पण एखाद्या व्यक्तीचा जीव धोक्यात असताना समाजाने मौन धारण करणे ही निरोगी लोकशाहीची खूण नाही.

लोकशाहीत सरकारने संवादाचा मार्ग स्वीकारावा, आंदोलनकर्त्यांनीही लोकहिताचा व्यापक विचार करून पुढील दिशा ठरवावी आणि समाजाने प्रेक्षकाची भूमिका सोडून जागरूक नागरिक म्हणून आपली जबाबदारी पार पाडावी. सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरणे गरजेचे आहे. कारण ज्या समाजात प्रश्न विचारणारे, शांततामय मार्गाने संघर्ष करणारे आणि सार्वजनिक हितासाठी त्याग करणारे लोक कमी होतात, त्या समाजाची लोकशाही हळूहळू कमकुवत होत जाते. व त्या ठिकाणी हुकूमशाही अस्तित्वात येते. सोनम वांगचूक यांचे जीवन देशासाठी महत्त्वाचे आहे. मतभेदांपेक्षा संवाद, संघर्षापेक्षा संवेदनशीलता आणि उदासीनतेपेक्षा सक्रिय नागरिकत्व हीच आजची खरी गरज आहे. लोकशाही वाचवण्यासाठी ,संविधान वाचवण्यासाठी व हुकूमशाही वृत्तीला विरोध करण्यासाठी लोकांनी रस्त्यावर रुद्र शांततेच्या मार्गाने देशभर आंदोलन करणे काळाची गरज आहे. अन्यथा यापुढे कोणीही अशा प्रकारची शांततेच्या लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यास गजानन नाही आणि तो लोकशाहीसाठी मोठा धोका आहे हे जनतेने सुद्धा ओळखावे व शासनाने सुद्धा या बाबत आपली भूमिका स्पष्ट करून निर्णय घेणे गरजेचे आहे. निर्भय बनो...

**गजानन ओंकार हरणे,**
खडकी ,अकोला मो. 9822942623.


# अल निनोचा इफेक्ट महाराष्ट्रात जाणवतोय?

अल निनो ही एक जागतिक हवामानविषयक घटना आहे, जिचा थेट आणि तीव्र परिणाम भारतासह महाराष्ट्राच्या हवामानावर आणि पर्यायाने संपूर्ण अर्थव्यवस्थेवर होतो. प्रशांत महासागरातील पाण्याच्या पृष्ठभागाचे तापमान सरासरीपेक्षा जास्त वाढल्यामुळे ही परिस्थिती निर्माण होते. महाराष्ट्राच्या संदर्भात अल निनोचा प्रभाव हा मुख्यतः दुष्काळ, पावसाची अनिश्चितता आणि शेतीचे नुकसान या रूपांत पाहायला मिळतो.

महाराष्ट्रावर होणाऱ्या अल निनोच्या प्रभावाचा सविस्तर आढावा खालील मुद्द्यांच्या आधारे घेता येईल. मान्सूनमधील खंड आणि अपुरा पाऊस अल निनोच्या वर्षात महाराष्ट्रात मान्सूनचे आगमन उशिराने होते. पाऊस वेळेवर न पडल्यामुळे किंवा पडल्यानंतर त्यात मोठा खंड (Monsoon Break) पडल्यामुळे राज्याला भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. महाराष्ट्रातील सरासरी पावसाच्या प्रमाणात १०% ते ३०% पर्यंत घट होऊ शकते. विशेषतः मराठवाडा आणि विदर्भ या भागांना याचा सर्वाधिक फटका बसतो.

**वाढते तापमान आणि उष्णतेची लाट (Heatwaves)**

अल निनोच्या प्रभावामुळे मान्सूनपूर्व आणि मान्सूनच्या काळातील तापमानात कमालीची वाढ होते. विदर्भ आणि खानदेशात तापमान ४५°C च्या पार जाते. वाढत्या उष्णतेमुळे बाष्पीभवनाचा वेग वाढतो, ज्यामुळे जमिनीतील ओलावा वेगाने कमी होतो आणि पाणी साठे आटतात. मुसळधार पाउस आणि अचानक खंड अल निनोचा परिणाम दिसत आहे.




**शेती क्षेत्रावर गंभीर परिणाम**

महाराष्ट्र ही मुख्यत्वे मान्सूनवर आधारित शेती असणारे राज्य आहे. अल निनोमुळे शेतीचे चक्र पूर्णपणे कोलमडते.

**पेरण्यांना उशीर :** पाऊस लांबल्यामुळे खरिपाच्या पेरण्या खोळंबतात किंवा दुबार पेरणीचे संकट ओढवते.

**उत्पादनात घट :** सोयाबीन, कापूस, ऊस, आणि तूर यांसारख्या मुख्य पिकांच्या उत्पादनात मोठी घट होते.

**फळबागांचे नुकसान :** पाऊस कमी झाल्यामुळे भूजल पातळी खालावते, ज्यामुळे कोकण आणि पश्चिमेकडील भागांतील आंबा, काजू आणि द्राक्षांच्या बागांना पाण्याचे दुर्भिक्ष जाणवते.

**पाण्याचे दुर्भिक्ष आणि टँकरची संस्कृती**

पाऊस कमी झाल्यामुळे महाराष्ट्रातील प्रमुख धरणे (जसे की जायकवाडी, कोयना, उजनी) पूर्ण भरत नाहीत. यामुळे पाणी कपात लागू केली जाते. मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड) आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांत टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागतो. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनतो, ज्यामुळे शासनाला 'चारा छावण्या' सुरू कराव्या लागतात.

**आर्थिक आणि सामाजिक परिणाम**

शेतीचे नुकसान झाल्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठा धक्का बसतो. शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा वाढतो, ज्यामुळे शेतकरी आत्महत्येसारख्या दुर्दैवी घटनांमध्ये वाढ होण्याची भीती असते. रोजगारासाठी ग्रामीण भागातून मुंबई, पुणे यांसारख्या शहरांकडे स्थलांतर वाढते. अन्नधान्याचे उत्पादन घटल्यामुळे बाजारात महागाई (विशेषतः डाळी आणि भाज्यांचे भाव) वाढते.

**थोडक्यात सांगायचे तर...**

अल निनो हा महाराष्ट्रासाठी केवळ एक 'हवामान बदल' नसून ते एक मोठे आर्थिक आणि सामाजिक संकट ठरते. यामुळे राज्याला दुष्काळ, पाणीटंचाई आणि शेतीमधील मंदीचा सामना करावा लागतो. या संकटाचा सामना करण्यासाठी आता राज्य सरकार आणि शेतकरी 'हवामानपूरक शेती', ठिबक सिंचन आणि जलसंधारणाच्या मोहिमांवर अधिक भर देत आहेत.

# यशोगाथा : 8 ते 9 तासांची नोकरी करत यूपीएससीमध्ये मिळवले यश!

## सृष्टी डबास यांची प्रेरणादायी कहाणी





**शिक्षण आणि नोकरीचा प्रवास**

सृष्टी यांचे शिक्षण दिल्लीतच झाले. १२ वी पूर्ण केल्यानंतर त्यांनी दिल्लीच्या इंदिरा ट्रस्ट कॉलेजमधून राज्यशास्त्र या विषयात पदवी पूर्ण केली. त्यानंतर त्यांनी इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठातून आपली पदव्युत्तर पदवी पूर्ण केली. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांची भारतीय रिझर्व्ह बँकेत निवड झाली. याशिवाय त्यांना सामाजिक न्याय मंत्रालयातही काम करण्याचा अनुभव आहे. मात्र, त्यांचे अंतिम ध्येय हे 'आयएएस' अधिकारी बनण्याचेच होते.

डोळे उघडे ठेवून पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी कौटुंबिक अडचणी किंवा वेळेची कमतरता कधीही आडवी येत नाही, हे दिल्लीच्या सृष्टी डबास यांनी सिद्ध केले आहे. रिझर्व्ह बँकेसारख्या प्रतिष्ठित संस्थेत रोज ८ ते ९ तासांची नोकरी सांभाळत, काहीतरी करून दाखवण्याची जिद्द असेल तर माणूस अशक्य गोष्टीही साध्य करू शकतो, याचे उत्तम उदाहरण त्यांनी मांडले आहे. कोणत्याही मोठ्या व्यावसायिक क्लासशिवाय त्यांनी पहिल्याच प्रयत्नात देशात ६ वा रँक मिळवून इतिहास रचला.

नोकरी करणाऱ्या उमेदवारांनी वेळेच्या कमतरतेचे रडगाणे न गाता उपलब्ध असलेल्या प्रत्येक मिनिटाचा गुणात्मक वापर करावा. एखादी परिस्थिती किती अवघड असली तरी तिथे मार्ग निघत असतो. नोकरी करतही केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करता येते हे आयएएस सृष्टी डबास यांच्या यशोगाथेवरून दिसते. सृष्टी यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत आणि दिवसाला ८ ते ९ तासांची नोकरी सांभाळत सृष्टी यांनी केवळ यूपीएससी परीक्षा उत्तीर्णच केली नाही, तर पहिल्याच प्रयत्नात देशात सहावा रँक मिळवून इतिहास रचला.

दिल्लीच्या रहिवासी असलेल्या सृष्टी डबास यांचा हा प्रवास अत्यंत आव्हानात्मक होता.

सृष्टी यांच्या डोक्यावर वडिलांचे छत्र नव्हते. त्यामुळे त्यांच्या आईनेच संपूर्ण कुटुंबाची आणि घराची जबाबदारी उचलली. आपल्या आईचे कष्ट जवळून पाहिलेल्या सृष्टी यांनी आईचे नाव अभिमानाने उंच करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेण्याचा निश्चय केला आणि तो पूर्णही केला. त्यांचा हा प्रवास आज देशभरातील लाखो तरुण-तरुणींसाठी, विशेषतः नोकरी करत स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरत आहे.

# कर्जमुक्ती आता अधिक व्यापक



शेतकरीराजा आणि कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने सर्वात मोठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६' जाहीर करुन शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्याचा ऐतिहासिक असा निर्णय घेतला आहे. या योजनेची व्यापकता वाढवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पात्र शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार असल्याची घोषणा केली आहे याविषयी ही माहिती...*

शेतकरी बांधवांना सन्मानाने राजा म्हणून संबोधले जाते. तो जगाचा पोशिंदा आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेचा तो एक महत्त्वाचा कणा आहे. अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी व महापूर यांसारख्या नैसर्गिक संकटांमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तसेच त्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होऊन कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने सर्वात मोठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६' जाहीर करुन शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्याचा ऐतिहासिक असा महानिर्णय घेतला आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक कुशल प्रशासक, रयतेच्या कल्याणासाठी आयुष्य वेचणाऱ्या लोकाभिमुख शासक होत्या. शेती, सिंचन, जलसंधारण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला त्यांनी दिलेले प्रोत्साहन आजही आदर्श मानले जाते. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना न्याय देण्याची त्यांची भूमिका होती. म्हणूनच त्यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षात शेतकरी कल्याणाशी निगडित या महत्त्वपूर्ण योजनेस "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना" हे नाव देऊन शासनाने त्यांच्या कार्याला अभिवादन केले आहे.

शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी राज्य शासनाने यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७, महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ आणि महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजनेअंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना २०२२ जाहीर करुन शेतकऱ्यांना वेळोवेळी भरीव मदत केली आहे. राज्यातील शेतकरी कर्जमुक्तीनंतरही थकीत कर्जाच्या दुष्टचक्रामध्ये अडकत असल्याचे दिसून येते. शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून कायमस्वरुपी सोडवणूक करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता म्हणून याद्दष्टीने शिफारशी करण्यासाठी मुख्यमंत्री यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (मित्र) प्रविण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती गठीत केली होती. या समितीने शेतकऱ्यांना कर्जमुक्तीची आवश्यकता, शेतकऱ्यांवर वारंवार कर्जमाफीची वेळ का येते? त्यांच्या उत्पन्नात स्थैर्य का निर्माण होत नाही? भविष्यात शेतकरी पुन्हा कर्जाच्या चक्रात अडकू नयेत, शेतकरी सक्षम व्हावा याबाबत अल्पकालीन आणि दीर्घकालीन अशा दोन्ही प्रकारच्या उपाययोजना सुचविलेल्या आहेत. मात्र तातडीचा दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ देणारी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' ही ऐतिहासिक योजना असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले. अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना त्यांनी जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत ५० हजार रुपयांचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर योजनेमध्ये ५० हजार रुपयांचा लाभ देण्याची मर्यादा काढून टाकण्यात आली आहे, अशा शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. तसेच नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी २०२६-२७ मध्ये कर्जाची उचल करून वेळेत परतफेड करण्याची अट रद्द करण्याची घोषणा केली आहे. राष्ट्रीयकृत, व्यापारी, खासगी आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडील माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ मिळणार आहे. पूर्वीच्या योजनेत दोन लाख रुपयांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळत नव्हता. मात्र, नव्या योजनेत दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असली तरी दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी दिली जाणार आहे. महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील पात्र शेतकऱ्यांसाठी दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीसाठी असलेली ५० हजार रुपयांची मर्यादा आणि २०२६-२७ मधील नियमित परतफेडीची अट रद्द करण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यावर अतिरिक्त आर्थिक भार पडणार असला तरी कोणताही पात्र शेतकरी वंचित राहू नये, ही शासनाची भूमिका आहे. कृषी क्षेत्रासाठी राज्य शासन दरवर्षी सुमारे ९५ हजार कोटी रुपयांचा खर्च करीत असल्याचे सांगताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शेतकऱ्यांच्या वीजबिलासाठी २५ हजार कोटी रुपये खर्च केले जातात. कापसाची १३६ लाख क्विंटल खरेदी करून १० हजार ८८३ कोटी रुपयांचे चुकारे अदा करण्यात आले आहेत. सोयाबीनचे ६ लाख टन उत्पादन ३ हजार १९८ कोटी रुपयांना खरेदी करण्यात आले.

**विभागीय माहिती कार्यालय,**
अमरावती

# महाराष्ट्राच्या पाटबंधारे व सिंचन क्षेत्राला नवसंजीवनी देणारे द्रष्टे!

डॉ. शंकरराव भाऊराव चव्हाण यांचा जन्म१४ जुलै १९२० मध्ये पैठण येथे झाला. ते महाराष्ट्राचे चौथे मुख्यमंत्री आणि भारताचे केंद्रीय गृहमंत्री होते. 'हेडमास्टर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या शिस्तप्रिय नेत्याने हैदराबाद मुक्तिसंग्रामात व महाराष्ट्राच्या जडणघडणीत, विशेषतः पाटबंधारे व सिंचन क्षेत्रात मोठे योगदान दिले.शंकरराव चव्हाण या राजकीय व सामाजिक कार्यत्यांचा जन्म औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण येथे एका शेतकरी कुटुंबात झाला. ते उस्मानिया विद्यापीठातून बी.ए., एलएलबी झाले.स्वामी रामानंद तीर्थ यांच्या सल्ल्यानुसार ते हैदराबाद मुक्तिसंग्रामात सामील झाले. यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड हे त्यांच्या कार्याचे केंद्र होते. ते दोनदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यांनी केंद्रात अर्थ, संरक्षण आणि गृहमंत्री अशी महत्त्वाची पदे भूषवली.

१३ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान भारतात सामील झाले आणि शंकररावांच्या कर्तृत्वाचे एक पर्व पूर्ण झाले. १९४८-४९ मध्ये नांदेड जिल्हा काँग्रेसचे ते सरचिटणीस झाले. १९५२ च्या निवडणुकीत पराभव होऊनही ते खचले नाहीत. त्यांनी नांदेड नगरपालिकेत, सहकारी क्षेत्रात व कामगारवर्गात कार्य केले. नांदेडचे नगराध्यक्ष, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष आणि हैदराबाद राज्य सहकारी बँकेचे संचालक इ. विविध पदे त्यांनी भूषविली. १९५६ मध्ये मराठवाडा महाराष्ट्रात समाविष्ट झाला, त्यावेळी शंकररावांना मंत्रिमंडळात उपमंत्रिपद मिळाले. पुढे १९६० मध्ये पाटबंधारे व वीज खात्याचे ते मंत्री झाले आणि नंतर १९७२ पासून फेब्रुवारी १९७५ पर्यंत ते कृषिमंत्री होते. २१ फेब्रुवारी १९७५ रोजी ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले.

पाटबंधारे मंत्री म्हणून त्यांनी भरीव कामगिरी केली. कृष्णा-गोदावरी पाणी तंट्यात त्यांची भूमिका वाखाणण्यासारखी आहे. गोदावरी, पूर्णा आणि मांजरा या धरणांद्वारा त्यांनी मराठवाड्याचा विकास घडवून आणला. जायकवाडी प्रकल्प हा शंकररावजींच्याच प्रयत्नाचे मोठे फळ आहे. भ्रष्टाचाराचे निर्मूलन, अधिक कार्यक्षम प्रशासन, १० लाख टनांहून अधिक धान्य उत्पादन वगैरे त्यांची धोरणे आहेत.

कोणताही राजकीय प्रश्न ते समझोत्याने सोडवित असत. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा मे १९७५ मधील संप ज्या पद्धतीने त्यांनी हाताळला, त्यावरून हे सिद्ध होते. ते रामानंदतीर्थ व गोविंद श्रॉफ यांना राजकीय गुरू मानायचे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय गृहमंत्री, मराठवाड्यातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते स्व. शंकरराव चव्हाण यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण आज नांदेडमध्ये होत आहे. श्रीमती सोनिया गांधी यांच्या हस्ते हा अनावरण समारंभ असल्यामुळे या कार्यक्रमाला एक राजकीय उंची मिळाली आहे.

माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचीही कार्यक्रमाला उपस्थिती असणार आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील आणि शंकरराव चव्हाण या चार मुख्य नेत्यांची दखल घेतल्याशिवाय महाराष्ट्राचा राजकीय, आर्थिक आणि सामाजिक इतिहास पुढे जाणार नाही. यशवंतराव चव्हाण आणि वसंतदादा पाटील हे पश्चिम महाराष्ट्रातील, वसंतराव नाईक हे विदर्भातील आणि शंकरराव चव्हाण मराठवाड्याचे, असा हा महाराष्ट्राच्या पहिल्या ४० वर्षांचा राजकीय समतोल आहे.



**आज शंकरराव चव्हाण यांची जयंती**

शंकरराव चव्हाण आणखीन वेगळे. तसे नांदेड हे दूरवर एका टोकाला. निजामाच्या राजवटीत त्या सत्तेविरुद्ध लढा दिलेल्या त्यावेळच्या बिनीच्या नेत्यांमध्ये स्वामी रामानंद तीर्थ, पी. व्ही. नरसिंह राव, गोविंदभाई श्रॉफ, अनंतराव भालेराव, गोपाळराव एकबोटे, दिगंबरराव बिंदू यांच्या बरोबरीने शंकरराव चव्हाण यांचाही मोठा वाटा. सचोटी, टापटिप, शिस्त आणि घेतलेल्या कामात पूर्ण झोकून देऊन काम करणे हे शंकररावांचे गुणविशेष. महाराष्ट्राच्या 'सचिवालया'चे 'मंत्रालय' असे नामकरण शंकरराव यांनीच केले. त्यापूर्वी मंत्रालयात जत्रेसारखी माणसे फिरायची. त्यांना काही शिस्त शंकरराव चव्हाण यांनी लावली.

प्रत्येक मजल्यावर चहाची गाडी ही शंकररावांचीच कल्पना. शेतीला बारमाही पाणी की, आठमाही पाणी, या वादात गरीब शेतक-यांच्या बाजूने उभे राहणारे शंकरराव. ७० बादल्या पाणी उसाला, याला पहिला विरोध शंकरराव यांनी केला. शेतक-यांची सावकरांकडे गहाण पडलेली भांडी-कुंडी मुख्यमंत्री झाल्यावर ५० कोटी रुपये अदा करून त्यांनीच सोडवून दिली.

मुंबईतील गिरण्यांच्या जमिनी मालकांच्या घशात घालायला शंकररावांचा विरोध होता. म्हणूनच गिरणी कामगारांचे मरण दोन वर्षांनी लांबले. मुख्यमंत्री होण्यापूर्वी ते पाटबंधारे आणि वीजमंत्री होते. आज महाराष्ट्रात जी महाकाय धरणे आहेत, त्यात बाळासाहेब देसाई यांनी उभे केलेले 'कोयना' धरण वजा केले तर महाकाय जायकवाडी, उजनी, अप्पर वर्धा, काळ, काळीसरार, अरुणावती, विष्णुपुरी ही सगळी धरणे शंकरराव पाटबंधारे मंत्री असतानाच झाली आहेत.

महाराष्ट्राचे वीजमंत्री असताना कोराडी, पारस, एलदरी, चंद्रपूर ही औष्णिक वीजकेंद्रे शंकररावांच्या काळात उभी राहिली.

महाराष्ट्राच्या आजच्या विकासाच्या नकाशात वसंतराव नाईक मुख्यमंत्री आणि शंकरराव चव्हाण पाटबंधारे, वीजमंत्री यांचे योगदान फार मोठे होते. असे हे शंकरराव सलग ५० वर्षे राजकारणात होते.

१९५२ साली ते नगराध्यक्ष झाले आणि २००२ साली राज्यसभेतून निवृत्त झाले. अशी ही सत्तेची सलग ५० वर्षे. पण ना सत्ता त्यांच्या अंगाला चिकटली, ना सत्तेच्या मोहात ते अडकले. त्यामुळे मंत्री, मुख्यमंत्री, केंद्रीय गृहमंत्री, संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री, अर्थमंत्री अशा सर्व महत्त्वाच्या जागांवर काम करताना शंकरराव चव्हाण यांच्यावर कसलाही आरोप ५० वर्षात होऊ शकला नाही, ही गोष्ट वाटते तेवढी सोपी नाही.

राजकारणातील सत्तेचे मोह आणि सत्तेपासून मिळणारे फायदे घेताना भलेभले लडबडून जातात. शंकररावांना सत्तेचा मोह झाला नाही आणि चुकीचे वागणे त्यांच्याकडून कधी झाले नाही. १९७८ साली काँग्रेसपासून वेगळे होऊन त्यांनी 'महाराष्ट्र समाजवादी काँग्रेस' हा वेगळा पक्ष स्थापन केला. त्या पक्षाचे साधे आमदार असताना मंत्रालयामागील आमदार निवास ते रिगल समोरील जुने विधान भवन इथे विधानसभेच्या काळात ते चक्क चालत जायचे आणि चालत परत यायचे.

भर उन्हात ते चालत जात असताना रस्त्यावरील अनेक लोक 'ते बघ शंकरराव चव्हाण' अशी बोटे करून त्यांच्याकडे बघत असत. या सगळया कालखंडात स्वतःचा वेगळा पक्ष काढला तरी काँग्रेस या पक्षाबद्दलची त्यांची निष्ठा कधीही कमी झाली नाही. पश्चिम महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांच्या कुरघोडीनंतर आपले वेगळे अस्तित्व दाखवण्याकरिता त्यांनी हा पक्ष काढला होता. आणि त्यांचाही एक मोठा गट होता.

केंद्रीय मंत्री म्हणून शंकरराव यांचा कार्यकाळ हा अगदी विलक्षण आहे. या देशात गृहमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री आणि संरक्षणमंत्री अशा चार मोठया खात्यांचा कारभार सांभाळणारे जसे यशवंतराव चव्हाण होते, त्यानंतर हा मान शंकरराव चव्हाण यांना मिळालेला आहे आणि या मोठया चार खात्यांचा कारभार सांभाळताना ते कुठेही कमी पडले नाहीत. उलट पेटलेला पंजाब शांत करणे, तिथे निवडणुका घेणे, लोकप्रतिनिधींचे सरकार आणणे, यात शंकरराव यांनी अहोरात्र काम केले.

पंजाबमध्ये जी दहशत होती ती दहशत लोकांना विश्वास देऊन त्यांनी मोडून काढली. पंजाबच्या प्रत्येक जिल्ह्यात त्यांनी दौरा केला. उधमपूर येथे त्यांच्या सभेत फेकलेले रॅकेट त्यांच्या पायाशी येऊन पडले. पण नाक्या-नाक्यावर लाईट मशीन गन सुरक्षा व्यवस्था उभी करून शंकरराव यांनी पंजाबी जनतेत विश्वास निर्माण केला आणि निवडणुका यशस्वी करून दाखवल्या.

तिच गोष्ट बाबरी मस्जिद पाडण्यापूर्वी त्यांनी दिलेला इशारा नरसिंह राव यांनी ऐकला असता तर वेगळा इतिहास घडला असता. उत्तर प्रदेशचे त्यावेळचे मुख्यमंत्री कल्याणसिंग यांच्या अ?ॅफिडेव्हीटवर विश्वास ठेऊ नका, असे शंकररावांनी आपले मत नोंदवले होते. नरसिंह राव यांनी ते मान्य केले नाही. दुर्दैवाने पुढे जे घडले ते सर्वांना माहिती आहे.

देशाच्या आणि राज्याच्या हिताचा निर्णय घेताना दूरदृष्टी आणि विचार याचा समन्वय साधणारे हे महाराष्ट्रातील एक मोठे नेते होते यात शंका नाही. यशवंतराव आणि वसंतदादांचे वलय मोठे होते. राजाराम बापूही तेवढेच मोठे होते. तरीही शंकररावही काही लहान नव्हते. त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्याप्रमाणेच ते परिपूर्ण नेते होते.

सिटी न्यूज अकोला
मंगळवार, दि. १४ जुलै २०२६
Web. http://epaper.citynewssuperfast.com

## आ.रणधीर सावरकर यांच्या मागणीची दखल

# निकृष्ट सोयाबीन बियाणे प्रकरणी उद्या मंत्रालयात बैठक

प्रतिनिधी १४ जुलै



**अकोला :** अकोला जिल्ह्यात बोगस व निकृष्ट सोयाबीन बियाणे वितरणामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या संदर्भात अकोला पूर्व विधानसभा मतदारसंघाचे आमदार रणधीर सावरकर* यांनी केलेल्या आक्रमक मागणीची दखल घेऊन राज्याचे कृषिमंत्री नामदार दत्तात्रय भरणे यांनी 15 जुलै रोजी मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक बोलावली आहे. या बैठकीसाठी आमदार सावरकर यांना विशेष आमंत्रण देण्यात आले आहे.

राज्याचे मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकार सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. शेतकऱ्यांच्या भावना समजून घेणे, शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई करणे आणि शेतकऱ्यांना मदत देण्याच्या मागणीवर शासन काय उपाययोजना करू शकते यावर या बैठकीत चर्चा होणार आहे.

ही बैठक दि. 15 जुलै 2026, बुधवार रोजी मंत्रालयात आयोजित करण्यात आली आहे. आमदार सावरकर यांनी याआधी अधिवेशनात तसेच प्रत्यक्ष भेटून गेल्या 2-3 आठवड्यांपासून या संदर्भात कठोर कारवाईची मागणी लावून धरली होती. त्यानुसार जिल्हा प्रशासनाने काही प्रमाणात कारवाई केली असली तरी ती अपूर्ण आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी वर्षाताई मीना यांच्या दालनात शेतकरी, कृषी अधिकारी, जिल्हा प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि कृषी औषध विक्रेत्यांच्या प्रतिनिधींची संयुक्त बैठक घेण्यात आली. या बैठकीत आमदार सावरकर आणि आमदार हरीश पिंपळे उपस्थित होते. बैठकीत महत्त्वपूर्ण मुद्दे मांडून शेतकऱ्यांच्या भावना राज्य सरकारकडे पोहोचविण्यात आल्या. त्यानंतर तातडीने कृषिमंत्री भरणे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संवाद साधून आमदार सावरकर यांनी लोकभावना मांडल्या. याच अनुषंगाने शासनाने तातडीने बैठक बोलावण्याचा निर्णय घेतला.

दरम्यान, आमदार सावरकर यांनी यापूर्वी सुचविलेल्या शेतकरी कर्जमाफी योजनेच्या निर्णयाची देखील मुख्यमंत्र्यांनी दखल घेऊन कर्जमाफी केली आहे. या निर्णयाचे महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते, माजी मुख्यमंत्री *माननीय शरदचंद्र पवार* यांनी देखील स्वागत केले आहे. यावरून आ. सावरकर यांची अभ्यासू वृत्ती आणि शेतकऱ्यांविषयीची तळमळ सिद्ध झाली आहे.

# काळेगाव - भोकर रस्ता पूल पहिल्याच पावसात वाहून गेला

## तात्काळ दुरुस्ती करून चौकशी करण्याची गरज



पवन बेलसरे १४ जुलै

**अकोट :** तालुक्यातील काळेगाव- भोकर मार्गाच्या बांधकामासाठी शासनाने २ कोटी रुपयाचा निधी मंजूर केला होता. परंतु कामकाजामध्ये अनियमितता झाल्याची बाब निदर्शनास आली. पहिल्या पावसाने रस्ता पूल वाहून गेला. त्यामुळे परिसरातील शेतकर्‍यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. कामाची चौकशी करावी अशी मागणी आहे.

या रस्त्याचे २० फुट रुंद खडीकरण करण्यात आले. मात्र पुढील सुमारे २५० फूट रस्ता ३३ फुट रुंदीने करण्यात आला. अतिरिक्त अंदाजपत्रकात बाहेरून माती आणायची तरतूद असतानाही शेतकर्‍यांची सुपीक जमीन व मातीचा वापर करण्यात आल्याचा आरोप होत आहे. रस्त्यालगतच्या शेतामध्ये अंदाजे ४ फुट रुंद आणि ६ फुट खोल नाल्या खोदुन त्यातील माती रस्ते बांधकामासाठी वापरण्यात आली. त्यामुळे शेतीचे नुकसान झाले. शासनाच्या निर्देशानुसार शासकीय जमिनीतून उपलब्ध मातीचा वापर करणे अपेक्षित असताना तसे न करता शेतकऱ्यांच्या जमिनीचा वापर करण्यात आला असल्याचा संशय आहे. झालेल्या कामात अपहार दिसून येत आहे. रस्ता बांधकामात निकृष्ट दर्जाचे आणि खूप कमी प्रमाणात मटेरियल वापरल्याचा आरोप आहे. त्यामुळे पहिल्या पावसातच रस्ता आणि मागच्या वर्षी झालेला पूल वाहून गेला. या रस्त्यालगत काळेगाव आणि भोकर येथील शेतकर्‍यांची हजारो एकर शेती आहे. तरीही या गावातील शेतकर्‍यांनी शेतातील कामे कशी करायची हा प्रश्न उभा राहिला आहे. ठेकेदार, अभियंता यांची चौकशी करून रस्ता, पुलाची दुरुस्ती करावी. दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावे अन्यथा शेतकरी मिळून लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करू असा इशारा दिला आहे.

## नैराट येथील युवकावर रानडुकराचा प्राणघातक हल्ला

**अकोला :** अकोला जिल्ह्यातील नैराट येथे एका युवकावर रानडुकराने अचानक हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना १० जुलै रोजी सकाळी सुमारे ९ वाजताच्या सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, लक्ष्मण विष्णू नृपनारायण हे आपल्या शेतात काम करीत असताना अचानक एका रानडुकराने त्यांच्यावर हल्ला चढविला. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले असून त्यांच्या शरीरावर अनेक ठिकाणी खोल जखमा झाल्या आहेत. हल्ल्याची माहिती मिळताच परिसरातील शेतकरी व नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेत त्यांची सुटका केली. त्यानंतर त्यांना तातडीने अकोला येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू असून प्रकृतीवर वैद्यकीय पथक लक्ष ठेवून आहे. अलीकडील काळात रानडुकरे, नीलगाय व इतर वन्यप्राण्यांकडून शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिवस-रात्र शेतात राहून पिकांची राखण करावी लागत आहे. अशा वेळी वन्यप्राण्यांचा सामना झाल्यास शेतकऱ्यांच्या जीवितालाही धोका निर्माण होत असल्याचे या घटनेवरून पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

वन विभागाने तातडीने उपाययोजना करून रानडुकरांचा बंदोबस्त करावा, शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक पावले उचलावीत तसेच जखमी शेतकऱ्याला शासकीय मदत व नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी निर्भय बनो जन आंदोलन तथा राष्ट्रीय लोक आंदोलनाच्या वतीने समाजसेवक गजानन हरणे यांनी केली आहे.

# राज्य सरकारची कर्जमाफी मात्र जुन्या कर्जमाफीतून वंचित राहिलेल्या कर्जदार शेतकऱ्यांचे काय ?

मोहम्मद इमरान १४ जुलै



**आलेगाव :** राज्य सरकारने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना 2 लाख रुपयांपर्यंत कर्ज माफ करण्याची घोषणा केल्याने शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, अकोला जिल्ह्यात सन 2017 मधील महात्मा फुले कर्जमाफी योजना तसेच सन 2019 मधील छत्रपती शिवाजी महाराज कर्जमुक्ती योजना कर्जमाफी पासून वंचित राहल्याचे वास्तव आहे. सरकारने या शेतकऱ्यांचा सुद्धा यावर्षी होणाऱ्या कर्जमाफी योजनेत समावेश करावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

अकोला जिल्ह्यातील बऱ्याच शेतकऱ्यांनी सन 2013 ते 16 मध्ये विविध बँकांतून पीक कर्ज घेतलेले आहे हे सर्व कर्ज व्याजासह 2 लाखाच्या आतील होते. मात्र, तरीही बऱ्याच शेतकऱ्यांना बँकेची चूक म्हणा किंवा सरकार कडून महात्मा फुले कर्जमाफी योजनेचा लाभ मिळाला नाही.

तसेच 2019 च्या छत्रपती शिवाजी महाराज कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळाला नाही. अशा अनेक शेतकऱ्यांनी सबंधीत बँका, जिल्हा अग्रणी बँक डी डी आर कार्यालये ,जिल्हाधिकारी इत्यादी ठिकाणी तक्रारी केल्या होत्या मात्र त्यावर अद्यापही तोडगा निघाला नाही. काही बँकांनी या थकीत पीक कर्जधारक शेतकऱ्यांचे त्यांना न विचारता परस्पर पुनर्गठन केल्याचे समजते.

ज्या बँकांनी परस्पर शेतकऱ्यांना न विचारता त्याचे पीक कर्जाचे पुनर्गठन केले आहे अशा बँक व संबंधित अधिकारी यांचेवर शासनाने फौजदारी गुन्हे दाखल करावेत यासाठी लवकरच शेतकरी संघटनेच्या वतीने मा मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. ज्या शेतकऱ्यांचे पीक कर्ज हे सन 2016 पर्यंत 2 लाख रु आत होते मात्र ते नियमानुसार कर्जमाफी साठी पात्र होते अशा सर्व शेतकऱ्यांना पूर्णपणे कर्जमाफीतून सुटका द्यावी अन्यथा त्यांच्यावर अन्याय होईल.

> महात्मा फुले व छत्रपती शिवाजी महाराज कर्जमुक्ती योजनेतून सुटलेल्या शेतकऱ्याचे पीक कर्ज शासनाने या कर्जमाफी योजनेतून पूर्णपणे माफ करावे.
> **अविनाश देशमुख,** जनअभियान फाउंडेशन
>
> ..............................
>
> 2016 च्या अगोदर 2 लाखापेक्षा कमी असलेले बरेच पीककर्ज बँकेच्या चुकांमुळे दोन्ही कर्जमाफीत माफ झाले नाही असे सर्व कर्ज या कर्जमाफीत समाविष्ट करावे. व शेक-यांच्या संमतीविना परस्पर कर्जाचे पुनर्गठन केलेल्या बँकांवर व अधिकाऱ्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावे.
> **विनोद राऊत,** जिल्हा समन्वयक शेतकरी संघटना मळसुर, ता. पातूर

# अकोट हिवरखेड मार्गावरील वाहतूक ठप्प



प्रतिनिधी १४ जुलै

**हिवरखेड :** जळगाव हिवरखेड अकोट राज्य मार्गावर येथील विठोबा हॉटेल समोर मोठा वृक्ष उन्मळून पडला. सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही. परंतु वृक्ष काही वाहनांवर आणि वीज तारांवर कोसळले आहे असे प्रत्यक्ष दर्शनी सांगितले. वृक्ष पडल्यामुळे हिवरखेड अकोट राज्य महामार्गावरील वाहतूक बंद पडली होती.

या ठिकाणी ठेकेदाराने नालीचे काम केले असताना वृक्ष कोसळला असा आहे. तात्काळ मार्ग मोकळा करावा अशी मागणी मनसेचे निखील कराळे यांच्यासह शहरवासीयांनी केली.

# पारद येथील जि.प. शाळेचा स्लॅब कोसळला; मोठी जीवितहानी टळली

प्रतिनिधी १४ जुलै



**मूर्तिजापूर :** तालुक्यातील पारद येथील जिल्हा परिषद शाळेतील एका वर्गखोलीचा स्लॅब सोमवारी सकाळी अचानक कोसळला. सुदैवाने त्यावेळी इयत्ता पहिली व दुसरीचे विद्यार्थी शालेय परिपाठासाठी वर्गाबाहेर गेले होते. त्यामुळे मोठी जीवितहानी टळली.

शाळा सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी आपली दप्तरे वर्गात ठेवून प्रार्थनेसाठी शाळेच्या आवारात हजेरी लावली होती. त्याचवेळी वर्गखोलीचा स्लॅब कोसळल्याने एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच मुख्याध्यापक उमेश सराळे यांनी ग्रामपंचायत पदाधिकारी, ग्रामस्थ आणि शिक्षण प्रशासनाला तत्काळ कळविले.सदर वर्गखोलीचे बांधकाम सन २००९-१० मध्ये झाले होते. विशेष म्हणजे शाळेतील हीच सर्वात नवीन व पक्की इमारत होती. अशा स्थितीत या वर्गखोलीची ही अवस्था झाल्याने इतर जुन्या इमारतींमध्ये शिकणारे विद्यार्थी कितपत सुरक्षित आहेत, असा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे. शाळेतील एका वर्गखोलीचे बांधकाम सन १९७५ मधील असून उर्वरित तीन वर्गखोल्या सन १९६९ मधील आहेत.

पारद येथील जिल्हा परिषद शाळेत सध्या ६७ विद्यार्थी शिक्षण घेत असून येथे चार नवीन वर्गखोल्यांची आवश्यकता आहे. वारंवार मागणी करूनही शासनाकडून याबाबत आवश्यक कार्यवाही होत नसल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तातडीने नवीन वर्गखोल्या मंजूर करून बांधकाम करण्यात यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. घटनेची माहिती मिळताच माजी सरपंच विनोद मानकर, प्रशासक पती ज्ञानेश्वर भदे, पत्रकार नाजुराव खंडारे, गणेश बोबडे, गटशिक्षणाधिकारी यांनी पाहणी केली.

## एस.टी. बस सेवा सुरु करा अन्यथा तीव्र आंदोलन उभारू: निलेश कापकर



**आलेगाव :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची अकोला येथून सकाळी 8:50 वाजता आलेगावकडे येणारी तसेच आलेगाव येथून सकाळी 10:30 वाजता अकोल्याकडे जाणारी एस.टी. बस सेवा अचानक बंद करण्यात आल्याने परिसरातील विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी आणि सर्वसामान्य नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते निलेश कापकर यांनी केला आहे. बससेवा सुरू झाली नाही तर आंदोलन करू असा इशारा दिला आहे. या बसमधून दररोज अकोला येथील विविध शासकीय व खासगी कार्यालयांतील कर्मचारी, शिक्षक तसेच इतर नोकरदार वर्ग प्रवास करतात. अंबाशी येथील उर्दू शाळेच्या विद्यार्थिनी तसेच आलेगाव, उंबरवाडी व परिसरातील अनेक विद्यार्थी शिक्षणासाठी या बसवर अवलंबून आहेत. आलेगाव येथून सकाळी 10:30 वाजता अकोल्याकडे जाणाऱ्या बसने पातूर येथे शिक्षण घेणारे विद्यार्थी, देऊळगाव आयटीआयमधील विद्यार्थी तसेच शासकीय, वैद्यकीय, बँक व इतर कामांसाठी अकोल्याला जाणारे नागरिक नियमित प्रवास करतात. याशिवाय उंबरवाडी येथील इयत्ता सहावी ते बारावीपर्यंत शिक्षण घेणारी अनेक मुले दररोज आलेगाव येथे शिक्षणासाठी येतात.

# अकोल्यात 15 जुलैला विशेष 'प्लेसमेंट ड्राईव्ह

प्रतिनिधी १४ जुलै

**अकोला :** जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त अकोला जिल्ह्यातील युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे विशेष पुढाकार घेण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात सोमवार, दिनांक १५ जुलै २०२६ रोजी विशेष 'प्लेसमेंट ड्राईव्ह' (रोजगार मेळावा) सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अकोलाचे सहाय्यक आयुक्त प्रफुल्ल शेळके यांनी दिली आहे.

या मेळाव्यात स्थानिक तसेच जिल्ह्यातील नामांकित खाजगी कंपन्या, कारखाने आणि उद्योगसमूह सहभागी होणार आहेत. या माध्यमातून 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने'अंतर्गत प्रशिक्षणार्थींची निवड केली जाईल. यामध्ये 'अकोला जनता कमर्शियल को-ऑपरेटिव्ह बँक लि. अकोला' यांच्याकडील ३० पदांसाठी आणि 'श्रीमती पंचफुलादेवी पाटील सामाजिक महाविद्यालय, अकोला' यांच्याकडील ६ पदांसाठी अशा एकूण ३६ पदांकरिता प्रशिक्षणार्थींची थेट निवड केली जाणार आहे.

### इच्छुक उमेदवारांनी मेळाव्यात सहभागी होण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करावी

१. सर्वप्रथम www.mahaswayam.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या.
२. एम्प्लॉयमेंट या टॅबवर क्लिक करून जॉब सीकर हा पर्याय निवडा.
३. आपला नोंदणी/आधार कार्ड क्रमांक व पासवर्ड टाकून लॉगिन करा.
४. होम पेजवरील जॉब फेअर हा पर्याय निवडून, 'डिस्ट्रिक्ट' मध्ये अकोला जिल्हा निवडा व फिल्टर बटणावर क्लिक करा.
५. त्यानंतर दिसणाऱ्या मेळाव्याच्या नावापुढील ॲक्शन बटणाखालील 'व्ह्यू' (View) पर्यायावर क्लिक करा.
६. तेथे उपलब्ध उद्योजक व पदांची माहिती पाहून, आपल्या पात्रतेनुसार पद निवडून अप्लाय करा व आय ॲग्री पर्याय निवडा.
७. स्क्रीनवर "सक्सेसफुली अप्लाइड फॉर द जॉब" असा मेळावा संदेश आल्यानंतर नोंदणी स्लिपची प्रिंट काढून घ्या.

**थेट मुलाखतीसाठी येथे उपस्थित रहा :** ऑनलाईन नोंदणी केलेल्या आणि नोंदणी स्लिप घेतलेल्या उमेदवारांनी १५ जुलै २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, अकोला येथे स्वतःचा बायोडाटा, पासपोर्ट साईझ फोटो आणि आवश्यक सर्व मूळ कागदपत्रांसह प्रत्यक्ष उपस्थित राहावे.

# जिल्हास्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धेचा जोशात प्रारंभ

प्रतिनिधी १४ जुलै



**अकोला :** येथील श्री लाल बहादूर शास्त्री स्टेडियमवर जिल्हास्तरीय 'सुब्रतो मुखर्जी' फुटबॉल स्पर्धेला (१५ वर्षांखालील गट) सुरुवात झाली आहे. १५ वर्षांखालील मुलांच्या गटात एकूण २० संघांनी सहभाग घेतला आहे.

प्रमुख पाहुणे रामदासपेठ पोलिस स्टेशनचे निरीक्षक शिरीष खंडारे, डॉ.राजेश चंद्रवंशी प्राचार्य, आर.एल.टी. महाविद्यालय, सतीशचंद्र भट्ट जिल्हा क्रीडा अधिकारी, बुढन गाडेकर अध्यक्ष, शारीरिक शिक्षण शिक्षक संघटना म.न.पा) , नकीर खान अध्यक्ष, अकोला फुटबॉल असोसिएशन, गवई एएसआय, रामदास पेठ यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्‌घाटन करण्यात आले.

यावेळी त्यांनी खेळाडूंना सर्वोत्तम कामगिरी करण्यासाठी तसेच शिस्त पाळण्याबाबत आणि प्रशिक्षकांचा आदर करण्याबाबत प्रोत्साहित केले; तसेच अकोल्यासाठी यशस्वी खेळाडू बनून अकोला फुटबॉलचा दर्जा उंचावण्याचे आवाहन केले.

सुरुवातीच्या फेऱ्यांमध्ये माउंट कार्मेल स्कूल, प्रभात किड्स स्कूल, एम.एन.पी. उर्दू गर्ल्स स्कूल, सुफा स्कूल आणि अली पब्लिक स्कूल यांनी आपल्या प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध विजय मिळवला. या स्पर्धेचे आयोजन सुरजकुमार दुबे (क्रीडा मार्गदर्शक, राजेश गावंडे जिल्हा स्काऊट संघटक,मनीषा ठाकरे क्रीडा अधिकारी, अभिजीत फिरके क्रीडा अधिकारी, डॉ. नलिनी जाधव, (क्रीडा मार्गदर्शक) तसेच, अकोला जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे पदाधिकारी व पंच सईद (एन.आय.एस.), नईम खान, शोएब, अंझर कुरेशी, जुनैद, रझीक आणि रहीम — यांनी ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करीत आहे.

अमित दातकर, राधाकृष्ण थोसरे, निशांत वानखेडे (पर्यवेक्षक), अजिंक्य ढेवले, गजानन चाटसे, राजेश उगवेकर, या सर्वांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# फार्मसी कॉलेजच्या नुतन वास्तुची निर्मिती

प्रतिनिधी १४ जुलै

**अकोला :** पश्चिम विदर्भात १९८० साली स्थापन झालेली गीतादेवी खंडेलवाल इन्स्टीटयूट ऑफ फार्मसी अकोला या संस्थेला लवकरच ५० वर्ष पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने जुन्या इमारतीच्या जिर्णोध्दाराचे कार्य सुरु झाले आहे.

नूतन वास्तु निर्मितीचा संकल्प शिक्षण प्रसारक मंडळ अकोलाने केला होता. त्यानुसार माजी विद्यार्थी प्रा. शाम पाडोळे, संचालक, गुरुकुल एज्युकेशन, शेगांव यांच्या हस्ते नविन इमारतीच्या पहिल्या मजल्याचा स्लॅब भराईचा व विधिवत पूजनाचा कार्यक्रम १२ जुलै रोजी झाला. या प्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा डॉ. ताराताई हातवळणे यांनी सुध्दा पूजा केली. या प्रसंगी संस्थेचे सचिव गोपाल खंडेलवाल, मधुर खंडेलवाल, फार्मसी कॉलेजचे प्रभारी प्राचार्य सेवक खडतकर, भिकमचंद खंडेलवाल विद्यालयाचे प्राचार्य अभय वानखडे उपस्थित होते. यावेळी फार्मसी कॉलेजचे विद्यार्थी, तसेच गीतादेवी खंडेलवाल फार्मसी व भिकमचंद खंडेलवाल विद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## निधन वार्ता

### शुभदा जोशी



**अकोला :** राष्ट्र सेविका समितीच्या ज्येष्ठ सेविका शुभदा शरदचंद्र जोशी यांचे सोमवार, १३ जुलै रोजी निधन झाले. त्या ८९ वर्षांच्या होत्या. अकोला अर्बन बँकेच्या संचालिका, डॉ. आबाजी थत्ते सेवा अनुसंधान संस्थेच्या संस्थापक संचालिका, डॉ. आबाजी थत्ते रुग्णोपयोगी साहित्य केंद्राच्या संचालिका म्हणून त्यांनी कार्य केले होते. यासह विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून त्या सामाजिक क्षेत्रात सक्रिय होत्या. त्यांच्या पश्चात अकोला अर्बन बँकेचे अध्यक्ष शंतनू , डॉ. हेडगेवार सेवा समितीचे सचिव शशांक ही दोन मुले आणि मोठा आप्त परिवार आहे.

# सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

मंगळवार, दि. १४ जुलै २०२६ https://epaper.citynewssuperfast.com


## अल्पवयीन बेशिस्त वाहनचालकांवर कारवाईची मागणी

प्रतिनिधी १४ जुलै

**पांढरकवडा** : शहरात अल्पवयीन तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून विनापरवाना व वाहतूक नियमांचे उल्लंघन करून दुचाकी वाहने चालविण्याचे प्रमाण वाढत असून त्यामुळे गंभीर अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने पांढरकवडा पोलिस स्टेशनला निवेदन देऊन अशा विद्यार्थ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. शहरात अनेक शाळा व महाविद्यालये असून विद्यार्थी खासगी शिकवणीसाठी मोठ्या प्रमाणात ये-जा करतात. अनेक अल्पवयीन विद्यार्थी वाहन चालविण्याचा परवाना नसतानाही भरधाव वेगाने दुचाकी चालवित असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होत आहे. त्यामुळे वाहतूक नियमांचे काटेकोर पालन व्हावे आणि अशा विद्यार्थ्यांतर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. प्राचार्य डॉ. अजय सोळंके यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हा विषय अत्यंत गंभीर असल्याचे सांगितले.

# भट्टी गँगशी लिंकच्या संशयावरून आरोपी अटकेत

### नेपाळहून हैदराबादकडे पलायन ; नागपूर-हैदराबाद महामार्गावर एटीएसचा सापळा

प्रतिनिधी १४ जुलै




**यवतमाळ** : नागपूरमार्गे हैदराबादकडे ट्रॅव्हल्सने पळून जाणाऱ्या एका संशयित आरोपीला दहशतवादविरोधी पथक (एटीएस) आणि पांढरकवडा व करंजी हायवे पोलिसांच्या संयुक्त पथकाने केळापूर टोल नाका ते पाटणबोरीदरम्यान शुक्रवारी रात्री शिताफीने ताब्यात घेतले. कृष्ण कुमार यादव असे आरोपीचे नाव असून, एका गंभीर गुन्ह्याच्या तपासात तो एटीएसला हवा असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

शुक्रवारी रात्री साडेनऊच्या सुमारास करंजी पोलिस केंद्राचे सहायक पोलिस निरीक्षक नितीन कोयलवार हे पोलिस कर्मचारी अनिल तिरमारे, राहुल कदम, सुनील केंद्रे आणि चेतन उगले यांच्यासह केळापूर टोल नाक्यावर नाकाबंदीचे कर्तव्य बजावत होते.

त्याचवेळी एटीएसचे प्रमुख पोलिस निरीक्षक प्रदीप लांडे यांनी आरोपी नागपूरहून ट्रॅव्हल्सने हैदराबादच्या दिशेने निघाल्याची गोपनीय माहिती आणि त्याचे छायाचित्र करंजी पोलिसांकडे पाठविले.

माहिती मिळताच करंजी पोलिसांनी पांढरकवडा पोलिस ठाण्याचे ठाणेदार लहू तावरे यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर दोन्ही पथकांनी आरोपीच्या मोबाइल लोकेशनच्या आधारे केळापूर टोल नाका ते पाटणबोरीदरम्यान महामार्गावर शोधमोहीम सुरू केली.

महामार्गावरील एका हॉटेलजवळ उभ्या असलेल्या ट्रॅव्हल्स बसची तपासणी करताना एटीएसने पाठविलेल्या छायाचित्राशी मिळताजुळता प्रवासी आढळून आला. चौकशीत त्याने कृष्ण कुमार यादव असल्याची ओळख पटताच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. पुढील तपासासाठी त्याला पांढरकवडा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.

या कारवाईमुळे काही काळ महामार्ग परिसरात खळबळ उडाली. गोपनीय माहितीच्या आधारे समन्वयाने राबविण्यात आलेल्या या कारवाईबद्दल संयुक्त पथकाचे कौतुक होत आहे.

**भट्टी गँगशी संबंधांचा तपास**

- प्राथमिक माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या कृष्ण कुमार यादवचे पाकिस्तानस्थित गँगस्टार शहजाद भट्टी याच्याशी संबंध असल्याचा संशय तपास यंत्रणांना आहे. काही दिवसांपूर्वी एटीएसने विदर्भातील विविध ठिकाणी छापे टाकून काही संशयितांची चौकशी केली होती. यादव हा त्याच तपासातील महत्त्वाचा दुवा असल्याची चर्चा असून, नेपाळहून नागपूरमार्गे हैदराबादकडे जात असताना तो संयुक्त पथकाच्या सापळ्यात अडकला.

# बंद क्वार्टरमध्ये इसमाचा कुजलेल्या मृतदेह आढळला

### ओळख पटविण्यासाठी पोलिसांचे आवाहन

प्रतिनिधी १४ जुलै



**यवतमाळ** : पुसद ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील MIDC घाटोली परिसरात असलेल्या बंद पडलेल्या पक्क्या क्वार्टरमध्ये एका अनोळखी पुरुषाचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला असून त्याची ओळख पटविण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरू आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत व्यक्तीचे अंदाजे वय ४० वर्षे असून उंची सुमारे ५ फूट ३ इंच आहे. मृताच्या अंगात आकाशी रंगाचा टी-शर्ट असून त्यावर "श्री सुपीनाथ गणेश मंडळ अमाने" असा मजकूर छापलेला आहे. कमरेला लाल रंगाचा करदोडा, पांढऱ्या-विटकरी रंगाची 'Macho' कंपनीची अंडरवेअर तसेच नेव्ही ब्ल्यू रंगाची पॅन्ट अर्धवट खाली सरकलेल्या अवस्थेत आढळली. दोन्ही मांड्यांचा भाग कुजलेला असून उजव्या पायाच्या घोट्याजवळ पांढऱ्या रंगाच्या दुपट्ट्याची गाठ बांधलेली दिसून आली. घटनास्थळावरील परिस्थिती लक्षात घेता मृतदेह काही दिवसांपूर्वीचा असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

दरम्यान, या अनोळखी व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी जिल्ह्यातील तसेच शेजारील पोलीस ठाण्यांना माहिती देण्यात आली आहे. संबंधित वर्णनाशी जुळणारी कोणतीही बेपत्ता व्यक्तीची नोंद अथवा माहिती असल्यास तातडीने पुसद ग्रामीण पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## विजय चव्हाण यांची पोलीस जमादार पदी पदोन्नती

प्रतिनिधी १४ जुलै

**आर्णी** : येथील पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरिक्षक दुर्योधन राठोड यांचे विश्वासू रायटर विजय श्रीहरी चव्हाण यांची पोलीस नाईक पदावरून पोलीस जमादार पदावर पदोन्नती करण्यात आली आहे.

विजय चव्हाण यांच्या या पदोन्नतीबद्दल पोलीस विभागासह मित्रपरिवार आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा, शिस्तबद्ध कार्यपद्धती आणि वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली जबाबदारीने केलेल्या सेवेमुळे विजय श्रीहरी चव्हाण यांनी अल्पावधीतच आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे,विजय चव्हाण यांच्या कार्याची दखल घेत त्यांना ही पदोन्नती मिळाल्याने पोलीस सहकारी व मित्रपरिवारात आनंदाचे वातावरण आहे. याप्रसंगी पोलीस कर्मचारी व मित्रपरिवारातर्फे विजय चव्हाण यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले तसेच त्यांना पुढील सेवाकाळासाठी शुभेच्छा देत, त्यांच्या कर्तव्यदक्ष सेवेमुळे पोलीस दलाची प्रतिमा अधिक उंचावेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत असुन विजय चव्हाण यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून त्यांना शुभेच्छा दिल्या जात आहे. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी उज्ज्वल भवितव्याच्या सदिच्छा व्यक्त करण्यात येत आहे.

## नगर वाचनालयाच्या जागेवर शॉपिंग कॉम्प्लेक्सला विरोध; विशेष सभेत सत्ताधारी-विरोधक आमनेसामने

प्रतिनिधी १४ जुलै




**यवतमाळ** : दारव्हा नगरपरिषदेच्या विशेष सभेत नगर वाचनालयाच्या जागेवर शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारण्याच्या प्रस्तावावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी झाली. या प्रस्तावाला भाजपचे दोन आणि काँग्रेसचे सात नगरसेवकांनी तीव्र विरोध नोंदवत नगर वाचनालयाची जागा कायम ठेवण्याची मागणी केली.

ब्रिटिशकालापासून अस्तित्वात असलेल्या दारव्हा नगर वाचनालयात ४० हजारांहून अधिक ग्रंथसंपदा असून दररोज सुमारे २५० ते ३०० वाचक येथे येतात. शालेय विद्यार्थी, स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे युवक तसेच ज्येष्ठ नागरिक या वाचनालयाचा नियमित लाभ घेतात. त्यामुळे ही वास्तू शहराच्या ज्ञानपरंपरेचे आणि सांस्कृतिक वारशाचे प्रतीक असल्याचे विरोधकांनी सभेत नमूद केले.

भाजपचे नगरसेवक धनंजय बलखंडे यांनी मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देत वाचनालयाच्या जागेवर कोणताही व्यावसायिक प्रकल्प उभारू नये, अशी मागणी केली. विकासाला विरोध नसला तरी तो शिक्षण, ज्ञान आणि सामाजिक हित जपणारा असावा, असे त्यांनी स्पष्ट केले.

नगर वाचनालयाची जागा वाचनालयासाठीच कायम ठेवून त्याचे आधुनिकीकरण करावे, आधुनिक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात आणि पुढील पिढ्यांसाठी हे ज्ञानमंदिर जतन करावे, अशी मागणी विरोधी सदस्यांनी केली. दरम्यान, या विषयावर सभेत दोन्ही बाजूंनी जोरदार भूमिका मांडण्यात आल्याने वातावरण काही काळ तापले होते.

## वारकरी संप्रदायाच्या जिल्हा प्रसिद्धीप्रमुखपदी नीलकंठ धोबे

प्रतिनिधी १४ जुलै


**उमरखेड** : वारकरी संप्रदायाच्या यवतमाळ जिल्हा प्रसिद्धीप्रमुखपदी ज्येष्ठ पत्रकार नीलकंठ धोबे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गेल्या २५ वर्षांपासून पत्रकारितेच्या क्षेत्रात विविध सामाजिक, धार्मिक, आध्यात्मिक आणि राजकीय विषयांवर अभ्यासपूर्ण वृत्तसंकलन व लेखन करणाऱ्या धोबे यांच्या निवडीचे सर्वत्र स्वागत होत आहे.

उमरखेड तालुक्यातील बाम्हणगाव येथील रहिवासी असलेले नीलकंठ धोबे यांनी विविध वृत्तपत्रांमध्ये दीर्घकाळ कार्य करत समाजहिताचे प्रश्न प्रभावीपणे मांडले आहेत. अन्यायाविरुद्ध परखड भूमिका, सामाजिक समस्यांवर सातत्याने लेखणी चालविणे आणि वस्तुनिष्ठ पत्रकारिता ही त्यांची ओळख मानली जाते. वारकरी संप्रदायाच्या कार्याचा प्रचार-प्रसार अधिक प्रभावीपणे करण्याच्या उद्देशाने त्यांची जिल्हा प्रसिद्धीप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडीबद्दल त्यांनी वारकरी संप्रदायाचे जिल्हाध्यक्ष ह.भ.प. विनायकराव महाराज माने तसेच राष्ट्रीय अध्यक्ष ह.भ.प. अण्णासाहेब आहेर हिसवळकर (नाशिक) यांचे आभार मानले. त्यांच्या नियुक्तीबद्दल वारकरी संप्रदायासह पत्रकार, सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## अवधूतवाडीत 'भिंगरी'चा खेळ बिनधास्त

### मटका, ऑनलाइन जुगाराचे अड्डे खुलेआम सुरू

प्रतिनिधी १४ जुलै



**यवतमाळ** : शहरातील अवधूत वाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध जुगार व्यवसायाने पुन्हा डोके वर काढल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. मटका, ऑनलाइन भिंगरी तसेच प्रतिबंधित गुटखा-पान मसाल्याची विक्री काही भागांत खुलेआम सुरू असल्याची चर्चा असून, या प्रकारांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

आठवडी बाजार आणि शारदा चौक परिसरात अवैध जुगाराचे व्यवहार मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचा दावा स्थानिकांकडून केला जात आहे. गर्दीच्या ठिकाणी आणि पोलिसांच्या नियमित वर्दळीच्या परिसरातही हे प्रकार सुरू असल्याने कारवाईच्या अभावाबाबत नागरिकांकडून सवाल उपस्थित केले जात आहेत. विशेष म्हणजे हा व्यवसाय आता शहरातील संवेदनशील आणि प्रतिष्ठित भागांपर्यंत पोहोचल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांच्या निवासस्थानाजवळ तसेच आर्णी रोडवरील अग्निशामक दल कार्यालयासमोरील परिसरातही अशा प्रकारच्या हालचाली सुरू असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.

अवैध जुगारामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवत असल्याची चिंता सामाजिक कार्यकर्त्यांकडून व्यक्त केली जात आहे. झटपट पैसे मिळविण्याच्या नादात युवक आणि विद्यार्थी या व्यसनाधीन प्रवृत्तीकडे वळत असल्याने सामाजिक परिणाम गंभीर होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. जिल्हा पोलीस प्रशासनाकडून विविध मोहिमांच्या माध्यमातून गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले जाते. मात्र, शहरातीलच काही भागांत अवैध धंदे सुरू असल्याचे आरोप होत असल्याने या मोहिमांच्या प्रभावी अंमलबजावणीवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. दरम्यान, पोलिस प्रशासनाने या प्रकारांची गांभीर्याने दखल घेऊन मटका आणि ऑनलाइन जुगाराच्या अड्ड्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ज्येष्ठ नागरिक, व्यापारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे.

## पैनगंगा अभयारण्यातील आदिवासींच्या मूलभूत हक्कांचा प्रश्न ऐरणीवर

### बहुजन मुक्ती पार्टीचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन; १५ दिवसांत निर्णय न झाल्यास आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी १४ जुलै



**उमरखेड** : पैनगंगा अभयारण्य परिसरातील दुर्गम बंदीभागातील आदिवासी नागरिक आजही मूलभूत सुविधांपासून वंचित असल्याचा आरोप करत बहुजन मुक्ती पार्टीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. विद्वान केवटे यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी उपविभागीय अधिकारी, उमरखेड यांच्यामार्फत हे निवेदन देत भारतीय संविधानातील तरतुदींचा दाखला देत प्रशासनाला जाब विचारला.

निवेदनानुसार उमरखेड तालुक्यातील गाडी, बोरी, थेरडी, सोनदाबी, मोरचंडी, जेवली, परोटी आदी दुर्गम आदिवासी गावांमध्ये रस्ते, पूल, आरोग्य, वीज, शिक्षण आणि पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत सुविधा अद्यापही अपुऱ्या आहेत. मुख्य रस्त्यांची दुरवस्था, फुटलेले पूल, रखडलेली विकासकामे आणि पावसाळ्यात पुरामुळे निर्माण होणाऱ्या जीवघेण्या परिस्थितीकडेही निवेदनातून लक्ष वेधण्यात आले आहे.

थेरडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी नियमित उपलब्ध नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. अनेक गावांमध्ये वारंवार वीजपुरवठा खंडित होत असून शाळांमध्ये शिक्षक व आवश्यक निधीची कमतरता असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांकडे प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप बहुजन मुक्ती पार्टीने केला.

दुर्गम भागाचा संबंधित कायद्यात समावेश करणे, खराब रस्ते व पूल तातडीने दुरुस्त करणे, आरोग्य केंद्रात कायमस्वरूपी डॉक्टर व परिचारिकांची नियुक्ती करणे, बोरी व सोनदाबी येथे शिक्षकांची नियुक्ती तसेच थेरडी शाळेची दुरुस्ती करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या मागण्यांवर १५ दिवसांत सकारात्मक निर्णय न झाल्यास देशव्यापी आंदोलन छेडण्याचा तसेच भारतीय संविधानाच्या कलम ३२ अंतर्गत जनहित याचिका दाखल करण्याचा इशारा बहुजन मुक्ती पार्टीने दिला आहे. निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, जिल्हा आरोग्य अधिकारी, तहसीलदार, सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण व संबंधित विभागांना पाठविण्यात आल्या. यावेळी चक्रधर पाटील देवसरकर, बाजीराव गायकवाड, कृष्णा पाटील चंद्रवंशी, गजानन कदम, प्रवीण काळे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# उमरखेडमध्ये अनधिकृत ले-आऊटचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर; स्वतंत्र चौकशीची मागणी

### सहा कोटींची कथित वसुली रखडल्याचा आरोप : महसूल मंत्र्यांच्या निर्देशांनंतरही दुर्लक्ष, स्वतंत्र चौकशीची मागणी

प्रतिनिधी १४ जुलै

**उमरखेड** : उमरखेड शहर व तालुक्यातील कथित अनधिकृत ले-आऊटचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. एका सामाजिक तक्रारदाराने प्रशासनावर गंभीर आरोप करत, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कारवाईचे निर्देश दिल्यानंतरही प्रत्यक्षात कोणतीही प्रभावी अंमलबजावणी झालेली नसल्याचा दावा केला आहे.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, शहर व परिसरातील आरक्षणाच्या जागा, ग्रीन झोन, रेड झोन तसेच शासकीय जमिनींवर कथितपणे अनधिकृत ले-आऊट विकसित करून भूखंडांची विक्री करण्यात आली. या संदर्भात महसूल मंत्र्यांकडे तक्रार सादर केल्यानंतर जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांना कारवाईचे निर्देश देण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, त्यानंतरही परिस्थितीत कोणताही ठोस बदल झालेला नसल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे.

तक्रारदारांच्या दाव्यानुसार, सुमारे १५ ते १६ अनधिकृत ले-आऊटवर जवळपास सहा कोटी रुपयांचा दंड किंवा बोजा आकारण्यात आला होता. मात्र, दोन वर्षे उलटूनही या रकमेची वसुली झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच उर्वरित कथित अनधिकृत ले-आऊटचे पंचनामे करून कायदेशीर अहवाल सादर करण्याबाबत वारंवार निवेदने देऊनही महसूल यंत्रणेकडून अपेक्षित कार्यवाही झालेली नसल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

नगरपरिषद उमरखेडनेही आरक्षणाच्या जागा, ग्रीन झोन आणि रेड झोनमधील कथित अनधिकृत विकासाविरोधात प्रभावी कारवाई केली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांच्या कायदेशीर जबाबदाऱ्या पार पाडल्या का, तसेच या प्रकरणात निष्काळजीपणा किंवा संगनमत झाले आहे का, याची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी तक्रारदारांनी केली आहे.

दरम्यान, अनधिकृत ले-आऊटसंदर्भातील कारवाई ही महसूल, नगररचना आणि स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित कायद्यांनुसार केली जाते. दंड आकारला असल्यास त्याची वसुली, तसेच शासकीय किंवा आरक्षित जमिनीवरील विकासाची तपासणी करणे ही संबंधित यंत्रणांची जबाबदारी असल्याचे कायद्यात नमूद आहे.


## नगर परिषद आर्णी जि.यवतमाळ

Email: mcarni4@gmail.com दुरध्वनी क्र. 07234-266726

जा.क्र./नपआ/सा.प्र./कावि-1086/2026 दिनांक : 13/07/2026

### जाहीर निविदा सुचना

नगर परिषद आर्णी कडुन सन -2626-27 या वर्षाकरिता खालील नमुद कामाकरिता सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. तरी इच्छुक अनुभवी कंत्राटदार, एजन्सी यांचेकडून व्दि-लिफाफा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा फॉर्म फी रुपये | अनामत रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 1 | नगर परिषद आर्णी हद्दीतील नगर परिषदेने ठरवुन दिलेल्या ठिकाणी बॅनर / होर्डींग / पोस्टर्स / फ्लेक्स / जाहीरात बोर्ड तात्पुरत्या स्वरुपात लावणे करिता हक्क देणे, याकामी कंत्राट-दार/ कंत्राटदार, एजन्सी यांची नेमणूक करणे | 500/- | 20000/- |

सदर निविदा बाबत सविस्तर माहिती नगर परिषद कार्यालय, आर्णी (कर विभागात ) उपलब्ध आहे.

(रविंद्र राऊत)
मुख्याधिकारी,
नगर परिषद आर्णी.

# बोगस बियाणे कंपन्यांवर कारवाई न झाल्यास कार्यालय जाळून टाकणार!

## आ. बच्चू कडू यांचा इशारा, दोन लाख नुकसान भरपाईची तरतूद करा

प्रतिनिधी १४ जुलै

**अमरावती :** राज्यातील शेतकरी नैसर्गिक संकटांशी झुंज देत असताना बोगस आणि निकृष्ट बियाणे विकणाऱ्या कंपन्या त्यांच्या आयुष्याशी खेळत आहेत. निकृष्ट बियाण्यामुळे केवळ पीकच नष्ट होत नाही, तर शेतकऱ्याचे संपूर्ण वर्ष उद्ध्वस्त होते. पेरणी, मशागत, खते, औषधे, मजुरी, सिंचन, उत्पादन आणि कर्जाचा बोजा यामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या कोलमडतो. त्यामुळे बोगस बियाणे विकणाऱ्या कंपन्यांना कोणतीही दया न दाखवता कठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजे. अन्यथा बोगस बियाणे कंपन्यांची कार्यालये जाळून टाकू, असा इशारा आमदार बच्चू कडू यांनी दिला आहे.



बच्चू कडू यांनी सातत्याने उचलून धरलेल्या या प्रश्नाची दखल घेत कृषी विभागाने महत्त्वाची कारवाई सुरू केली असून, बोगस बियाणे पुरवठा करणाऱ्या तीन कंपन्यांविरुद्ध राज्यातील तीन वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये फौजदारी स्वरूपाचे एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. ही कारवाई शेतकऱ्यांच्या न्यायाच्या लढ्याचा पहिला टप्पा असला, तरी एवढ्यावर थांबून चालणार नाही. दोषी कंपन्यांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करून त्यांना कायद्याप्रमाणे कठोर शिक्षा झाली पाहिजे, अशी भूमिका बच्चू कडू यांनी मांडली.

### बियाणे अधिनियमात बदल करण्याची गरज

बच्चू कडू यांनी बियाणे अधिनियमात आमूलाग्र बदल करण्याची मागणीही केली आहे. बोगस किंवा निकृष्ट बियाणे आढळताच संबंधित कंपनीने त्त्काळ मोफत दर्जेदार बियाणे उपलब्ध करून देणे बंधनकारक करावे. बियाण्यामुळे हंगाम उद्ध्वस्त झाल्यास पेरणी, मशागत, खते, औषधे, मजुरी, सिंचन, उत्पादनातील नुकसान आणि वर्षभराच्या आर्थिक नुकसानीची संपूर्ण भरपाई कंपनीकडून सक्तीने वसूल करण्याची स्पष्ट कायदेशीर तरतूद करण्यात यावी. नव्या बियाणे अधिनियमात प्रति एकर किमान २ लाख नुकसानभरपाई देणे बंधनकारक करण्यात यावे. तसेच बोगस बियाणे विकणाऱ्या कंपन्या, वितरक आणि विक्रेत्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्याची स्पष्ट तरतूद करण्यात यावी.

### शेतकऱ्यांच्या न्यायाचा लढा थांबणार नाही!

'ज्या कंपन्या शेतकऱ्यांच्या घामाची लूट करतात, त्यांना व्यवसाय करण्याचा अधिकारच नाही. शेतकऱ्यांचा संसार उद्ध्वस्त करणाऱ्यांना कठोर शिक्षा झालीच पाहिजे. शासनाने त्वरित कठोर निर्णय घेतला नाही, बोगस बियाणे पुरवणाऱ्या कंपन्यांचे कार्यालय जाळून टाकणार. शेतकऱ्यांच्या न्यायासाठी हा लढा कोणत्याही परिस्थितीत थांबणार नाही,' असा इशारा बच्चू कडू यांनी दिला.

# प्रतिबंधीत गुटख्याची अवैध वाहतुक करणाऱ्या दोघांना घेतले ताब्यात



प्रतिनिधी १४ जुलै

## ५५ लाखाचा मुददेमाल जप्त

**अमरावती :** प्रतीबंधीत गुटख्याची अवैध वाहतुक करतांना २ इसम स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात घेतले असून ५५,००,०००/- लाखा यांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

आरोपी चे अब्दुल रफिक अब्दुल शब्बीर, वय ३५, रा हनुमान मंदिर, महेंद्र कॉलनी, अमरावती,अर्शद खान रहमत खान, वय ३०, रा ताज नगर, पठाण चौक, अमरावती असे नाव आहे. पोलीस अधिक्षक यांनी जिल्हयातील अवैध धंद्यांवर कारवाई करण्याच्या सुचना स्थानिक गुन्हे शाखेस दिल्या होत्या. त्यानुसार दिनांक १२/०७/२०२६ रोजी स्थागुशा पथक पोलीस स्टेशन तिवसा हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीलायक बातमी मिळाली कि, नागपुर वरून तिवसा कडे एक ब्राउन रंगाचा अशोक लेलैंड कंपनीचा ट्रक क. MH01CV6282 मधे शासनाने प्रतीबंधीत केलेल्या गुटख्याची अवैध वाहतुक होणार आहे अशा माहीती वरून स्थानिक गुन्हे शाखा पथकाने नागपुर ते अमरावती रोडवरील सुमीत हॉटेल तिवसा समोर सापडा रचुन दिनांक १३/०७/२०२६ रोजी पहाटे अशोक लेलँड कंपनीचा ट्रक थांबवुन त्यामधील दोन इसम ताब्यात घेवुन सदर अशोक लेलँड कंपनीचा ट्रक ची झडती घेतली असता त्यामध्ये शासन प्रतीबंधीत तंबाखुमिश्रीत सुगंधित पानमसाला बाजीराव व सुगंधित तंबाखु मस्तानी चे एकुण १३० मोठे पांढरे नायलॉन बोरे किं.अं. ३९,००,०००/- रू चा व सदर गुटखा वाहतुकी करीता वापरलेला अशोक लेलँड कंपनीचा ट्रक क MH01CV6282 किं. अं. १६,००,०००/ रू असा एकुण ५५,००,०००/- रू चा मुददेमाल जप्त करण्यात आला. व अन्न सुरक्षा अधीकारी यांचे फिर्याद वरून पोलीस स्टेशन तिवसा येथे गुन्हा नोद करण्यात आला असुन सध्या दोन्ही आरोपी हे पोलीस कस्टडी रिमांड मधे आहेत पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखा अमरावती ग्रामीण मार्फत सुरू आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक निकेतम कदम, अपर पोलीस अधिक्षक दत्ता तोटेवाड (मपोसे) यांचे मार्गदर्शनाखाली स्थागुशा प्रमुख पोनि अशोक लांडे यांचे नेतृत्वात पोउपनि सागर हटवार, पोलीस अंमलदार रविंद्र बावणे, बळवंत दाभणे, भुषण पेठे, निलेश डांगोरे, पंकज फाटे, चालक पोकॉ प्रशिक वानखडे यांचे पथकाने पार पाडली.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचा मार्ग मोकळा

## उच्च न्यायालयाच्या निर्णयाचे आमदार रवी राणा यांच्याकडून स्वागत

प्रतिनिधी १४ जुलै

**अमरावती :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक (इर्विन चौक) येथील पुतळा परिसरातील जागेसंदर्भात मा.उच्च न्यायालयाने आंबेडकरी अनुयायांच्या बाजूने दिलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयाचे आमदार रवी राणा यांनी मनःपूर्वक स्वागत केले आहे. या निर्णयामुळे सदर जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकासाठी अमरावती महानगरपालिकेकडे हस्तांतरित होण्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे.

याबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना आमदार रवी राणा म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकासाठी भाजप नेत्या तथा माजी खासदार नवनीत राणा यांनी खासदार निधीतून आर्थिक तरतूदही केली होती. मात्र प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने स्मारकाच्या उभारणीमध्ये अडथळे निर्माण झाले होते. हा गतिरोध दूर व्हावा यासाठी जागेचे मालक गट्टाणी यांच्याशी वेळोवेळी चर्चा करून सहकार्याची विनंती केली होती. तसेच तत्कालीन सरन्यायाधीश भूषण गवई यांच्याकडेही या विषयासंदर्भात पाठपुरावा केला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, लेडी गव्हर्नर डॉ कमलताई गवई आणि डॉ राजेंद्र गवई यांचे सहकार्य आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे आता स्मारक उभारणीचा मार्ग प्रशस्त झाला असून, हे अमरावतीसह संपूर्ण आंबेडकरी समाजासाठी अभिमानास्पद पाऊल असल्याचेही त्यांनी नमूद केले.

आमदार रवी राणा यांनी पुढे सांगितले की, नव्या पिढीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे, कार्याचे आणि सामाजिक परिवर्तनाच्या संदेशाचे ज्ञान मिळावे, यासाठी अत्याधुनिक, भव्य-दिव्य आणि प्रेरणादायी स्मारक उभारण्यासाठी आपण पूर्ण ताकदीने मदत व पाठपुरावा करणार आहोत.

# अंजनगाव बारी येथे विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयातर्फे मोफत आरोग्य शिबीर

प्रतिनिधी १४ जुलै

**अमरावती :** विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल), अमरावती अंतर्गत महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या संयुक्त विद्यमाने अंजनगाव बारी येथे नुकतेच भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नराटे आणि विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर आयोजित करण्यात आले होते. ग्रामीण भागातील नागरिकांना तज्ज्ञ वैद्यकीय उपचार व सल्ला जागेवरच उपलब्ध करून देणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश होता.

या विशेष तपासणी शिबिरामध्ये परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरात कर्करोग, हृदयरोग, मेंदूरोग, बालरोग यांसारख्या गंभीर आजारांसह लघवी व किडनी संबंधित विकार, किडनी प्रत्यारोपण, प्लास्टिक सर्जरी आणि कान-नाक-घसा संबंधित आजारांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी करण्यात आली. तसेच एन.सी. डी. (बिगर संसर्गजन्य आजार) अंतर्गत येणाऱ्या रुग्णांचेही स्क्रीनिंग करण्यात आले. यावेळी 70 रुग्णांची तपासणी करण्यात आली, ज्यापैकी पुढील उपचारांची आवश्यकता असलेल्या 6 रुग्णांना अमरावती येथील मुख्य विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात संदर्भित करण्यात आले आहे. या रुग्णांवर पुढील सर्व उपचार शासकीय योजनांतर्गत मोफत केले जाणार आहेत.

शिबिरामध्ये रुग्णांना सेवा देण्यासाठी रुग्णालयातील तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी डॉ. सपना गुप्ता, वैद्यकीय अधिकारी डॉ. रिंकुजय केचे, शिबीर समन्वयक अधिकारी भूपेंद्र जेवडे, अधिपरिचारिका कशिश दामले, अधिपरिचारक मिलिंद भगत, फार्मासिस्ट प्रतिमा राठोड, रुग्णवाहिका चालक दीपक शर्मा, कक्षसेवक अभिजीत उदयकर आणि आरोग्य सेविका सुजाता रोंडगे यांच्यासह इतर कर्मचारी उपस्थित होते.

# निकृष्ट सोयाबीन बियाण्याच्या विक्रीस परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यांना निलंबित करा; शिवसेनेची मागणी

प्रतिनिधी १४ जुलै

**अमरावती :** शिवसेनेचे अरुण पडोळे यांची शेतकऱ्यांसाठी आक्रमक भूमिका असून शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन अरुण पडोळे यांनी केली पाहणी.

जिल्ह्यात यावर्षी मोठ्या प्रमाणात बोगस निकृष्ट दर्जाचे सोयाबीन उत्पादक कंपन्यांमार्फत शेतकऱ्यांना विकले गेले, त्यामुळे जिल्ह्यातील 50% शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ आली आहे. यात अमरावती तालुक्यातील देवरा देवरी, नया अकोला, वलगाव, पुसदा, नांदुरा, संपूर्ण नांदगाव खंडेश्वर तालुका, मंगरूळ चव्हाळा सर्कल मधील गावांमध्ये बूस्टर हुतूतू, इनोव्हेज, रवी सीड, अशा अनेक कंपन्यांचे बियाणे बोगस आहेत. कृषी विभागातील



अधिकाऱ्यांनी अनेक कंपन्यांना परवाने दिलेत व सॅम्पल घेऊन ते सॅम्पल पास करून दिले, अशा सर्व कंपन्या तसेच कृषी विभागातील अधिकाऱ्यांनी सोयाबीनचे सॅम्पल पास करून बोगस बियाणे उत्पादक कंपनीला विक्रीची परवानगी दिली, अशा अधिकारी व कृषी विभागाचे कर्मचारी दोशी असल्यामुळे दोघांवरही निलंबनांची कारवाई करण्यात यावी जेवढी उत्पादक कंपनी जबाबदार आहे तेवढेच या कंपन्यांना विक्रीचे परवाने देणारे अधिकारी व सॅम्पल पास करणारे अधिकारी सुद्धा दोषी आहेत, त्यामुळे संबंधित कृषी अधिकाऱ्यांनी नैतिक जबाबदारी म्हणून आपले राजीनामे द्यावे नाहीतर त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात यावी. अशी मागणी शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख अरुण पडोळे यांनी पत्राद्वारे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषी वित्त राज्यमंत्री आशिषजी जयस्वाल, जिल्हाधिकारी अमरावती यांना केली.

# इटालियनस कॅफेवर भरोसा सेल ची धाड

प्रतिनिधी १४ जुलै

## पाच जोडपे पकडले

**अमरावती :** राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील 'इटालियन्स कॅफे'वर पोलिसांचा छापा मारून पाच जोडपी पकडण्यात आली. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली 'भरोसा सेल'च्या पोलीस निरीक्षक ज्योती विल्हेकर व त्यांच्या टीमने केली आहे.

या कॅफेमध्ये मुलं-मुली आक्षेपार्य अवस्थेत आढळून आले. पुढील कारवाई पोलीस करीत आहे.





माजी लेडी गव्हर्नर डॉ. कमलताई गवई (आई ) यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांना वाढदिवसानिमित्त खासदार नवनीत राणा यांनी मनःपूर्वक शुभेच्छा अर्पण केल्या. यावेळी त्यांच्या उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य व निरंतर समाजसेवेसाठी शुभेच्छा व्यक्त करत त्यांचे आशीर्वाद घेतले. त्यांच्या स्नेहपूर्ण मार्गदर्शनाने व आशीर्वादाने प्रेरणा मिळाली. यावेळी डॉक्टर राजेंद्र गवई यांचीही उपस्थिती होती.

# पावसाच्या खंडात सोयाबीन उत्पादकांनी घाबरू नये; कृषी संशोधन केंद्राचा सल्ला

**अमरावती:** जिल्ह्यात जून अखेरीस पेरणी झालेल्या सोयाबीन पिकाची अवस्था सध्या 12 ते 15 दिवसांची असून, गेल्या 5 ते 6 दिवसांपासून पावसाने ओढ दिली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी बांधवांनी घाबरून न जाता, कोणत्याही महागड्या फवारण्या न करण्याचे आवाहन अमरावती प्रादेशिक संशोधन केंद्र ( डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ) मार्फत कळविण्यात आले आहे.

# मतदार म्हणून ओळख हीच लोकशाहीची खरी ताकद-आ. सुलभाताई खोडके

## अमरावती विधानसभा क्षेत्रातील मतदार याद्यांचे 'विशेष सखोल पुनरिक्षण' कार्यक्रमाचा आढावा व संवाद सभा

प्रतिनिधी १४ जुलै

**अमरावती :** भारतीय संविधानाने प्रत्येक १८ वर्षावरील प्रौढ नागरिकाला मतदानाचा हक्क दिला आहे. लोकशाहीच्या बळकटीसाठी व देशाच्या सर्वांगिण विकासासाठी प्रत्येक व्यक्तीचे नाव मतदार यादीमध्ये असणे आवश्यक आहे.मतदार हे खूप मौल्यवान असून केवळ मतदानचं नाही तर भारतीय असल्याची ओळख व विविध योजनांच्या लाभासाठी मतदार यादीमध्ये नाव समाविष्ठ असणे आवश्यक आहे. मतदार हीच खरी लोकशाहीची ताकद असल्याने मजबूत, पारदर्शक आणि विश्वासार्ह लोकशाहीसाठी अमरावती मधील सर्व नागरिकांनी मतदार याद्यांचे 'विशेष सखोल पुनरिक्षण' मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन अमरावती विधानसभा मतदार संघाचे आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी केले आहे.



भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार देशभरासह महाराष्ट्रात मतदार याद्यांचे 'विशेष सखोल पुनरिक्षण' मोहिमेचा तिसरा टप्पा सुरु झाला असून 'अमरावती जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. त्या पार्श्वभूमीवर आज सोमवार दिनांक १३ जुलै २०२६ रोजी ३८,अमरावती विधानसभा मतदार संघातील या मोहिमेचा आढावा घेण्यासाठी अमरावती येथील मोर्शी रोड स्थित श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे संवाद सभा संपन्न झाली. यावेळी विधान परिषद आमदार संजय खोडके, मतदार नोंदणी अधिकारी तथा अमरावतीचे उपविभागीय अधिकारी - अनिल भटकर सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा अमरावती तहसीलदार - विजय लोखंडे ,आदींनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

या सभेमध्ये आमदार - सौ. सुलभाताई खोडके यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले कि, सद्यस्थितीत झपाट्याने झालेल्या शहरीकरणामुळे लोकसंख्येचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाले. अनेक मतदारांनी नवीन ठिकाणी नाव नोंदवले, पण जुन्या ठिकाणचे नाव वगळले नाही. परिणामी मतदारयाद्यांमध्ये दुबार मतदार म्हणून नावे वाढली असण्याची शक्यता असल्याने ही पडताळणी केली जात आहे. एकही पात्र मतदार सुटणार नाही आणि एकही अपात्र मतदार समाविष्ट होणार नाही' या मुख्य उद्दिष्टाने हा देशव्यापी कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या मोहिमेची अमरावती जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी व व्यापक यंत्रणा कार्यरत असतांना ग्रामीण व दुर्गम भागात मॅपिंगचे काम व गणकपत्राचे वितरण व डिजिटलायझेशनचे काम झपाट्याने होत आहे.

### बीएलओच्या मदतीला राष्ट्रवादीचे कार्यकर्ते

यावेळी संवाद साधनात आ.संजय खोडके यांनी सांगितले कि निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार व शासनाच्या आदेशान्वये राजकीय पक्षांनी प्रत्येक मतदान केंद्रावर आपल्या मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधीची तात्काळ नेमणूक करावी. असे सूचित केले असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रतिनिधी हे बीएलए म्हणून सर्व मतदार केंद्र स्तरीय अधिकाऱ्यांच्या मदतीला धावून येणार आहे. मतदार यादी पुनरिक्षण व गणक प्रपत्र संगणकीय करण्याचे काम हे संबंधित मतदान केंद्रस्तर अधिकाऱ्यांच्या माध्यमातून पूर्ण होणे अपेक्षित आहे . यासाठी संबंधित पर्यवेक्षकांनी बीएलओ कडून सदरचे काम जास्तीत जास्त पणे पूर्ण करण्यात यावे, याबाबत प्रचार -प्रसारावर सुद्धा लक्ष देऊन मतदारांमध्ये जागृती करावी, तसेच ज्या बीएलओ चे काम ५० टक्क्यापेक्षा कमी आहे, त्यांना शो कॉज म्हणजेच कारणे दाखवा नोटीस बजावून सदर प्रक्रिया गतीने पूर्ण करण्यासंदर्भात सुचना करावी, अन्यथा कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याबाबत सुद्धा बीएलओ यांना कळविण्यात यावे. अशा सुचना आ. संजय खोडके यांनी केली. मतदारांच्या तपशिलाची घरोघरी जाऊन पडताळणीसाठी बिएलओची भूमिका महत्वाची असून १०० टक्के एसआयआर मॅपिंग करणाऱ्या व गणकप्रपपत्राचे काम पूर्ण करणाऱ्या बिएलओ यांना सन्मानित करण्यात येणार असल्याचे सुद्धा आ. संजय खोडके यांनी यावेळी सांगितले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

मंगळवार, दि. १४ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com



तुकाराम मुंढे साहेब,
भ्रष्टअधिकाऱ्यांकडे
.द्या लक्ष, व्हा दक्ष




# एफडीएच्या टोल 'फ्री' वर तक्रार, गिरकेचा मॅनेजचा करार!

## एकीकडे दिखावा म्हणून तातपूर्ती कारवाई, दुसरीकडे दलालामार्फत वसुलीची घाई

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशिम शहरातील काही खासगी रुग्णालयांकडून रुग्णांना एका विशिष्ट मेडिकल स्टोअरमधूनच औषधे खरेदी करण्याची सक्ती केल्या जात असल्याच्या गंभीर तक्रारी समोर आल्या आहेत. या प्रकाराची अन्न व औषध प्रशासनाच्या टोल-फ्री क्रमांकावर तक्रार करूनही संबंधितांवर कारवाई न होता प्रकरण दडपल्याचा आरोप एका तक्रारदाराने केला आहे. या आरोपांमुळे अन्न व औषध प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, 'कुंपणच शेत खात आहे का?' अशी संतप्त प्रतिक्रिया तक्रारदाराने व्यक्त केली आहे. त्यामुळे या तक्रारीची चौकशी न करता संबंधित रुग्णालय आणि प्रकरण दाबणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाईची मागणी केली जात आहे.

तक्रारीनुसार, संबंधित रुग्णावर शहरातील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. तपासणीनंतर डॉक्टरांनी काही औषधे प्रिस्क्रिप्शनवर लिहून दिली. रुग्णाचा नातेवाईक सुरुवातीला रुग्णालयासमोरील मेडिकलमध्ये औषधे घेण्यासाठी गेला. मात्र, तेथील औषधांचे दर जास्त वाटल्याने त्याने इतर मेडिकलमध्ये चौकशी केली. मात्र, डॉक्टरांनी अत्यंत अस्पष्ट अक्षरात प्रिस्क्रिप्शन लिहिल्यामुळे इतर औषध विक्रेत्यांना औषधांची नावे समजण्यात अडचण आली. त्यामुळे एका मेडिकल चालकाने डॉक्टरांकडून स्पष्ट अक्षरात प्रिस्क्रिप्शन लिहून आणण्याचा सल्ला दिला. यानंतर संबंधित नातेवाईक डॉक्टरांकडे परत गेले आणि इतर मेडिकलमधून औषधे घेण्याची इच्छा व्यक्त केली. त्यावेळी डॉक्टरांनी संताप व्यक्त करत उद्धट वागणूक दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. 'मी अशाच अक्षरात लिहून डॉक्टर झालो. दुसऱ्या मेडिकलमध्ये कशाला गेला?' असे म्हणत डॉक्टरांनी पुन्हा त्याच अस्पष्ट अक्षरात प्रिस्क्रिप्शन लिहून दिल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे. त्यानंतरही इतर



मेडिकलमध्ये औषधे मिळाली नाहीत. अखेर एका औषध विक्रेत्याने, 'ही औषधे त्यांच्या रुग्णालयाच्या मेडिकलशिवाय अन्य मेडीकलवर मिळणार नाहीत. विनाकारण फिरू नका,' असा सल्ला दिला. त्यामुळे संबंधित रुग्णाच्या नातेवाईकाला नाईलाजास्तव रुग्णालयाशी संबंधित मेडिकलमधूनच तुलनेने महागडी औषधे खरेदी करावी लागली. या संपूर्ण प्रकारातून विशिष्ट मेडिकलवरूनच औषधे खरेदी करण्यासाठी रुग्णांवर अप्रत्यक्ष दबाव टाकला जात असल्याचा संशय तक्रारदाराने व्यक्त केला आहे. त्यानंतर जागरूक नागरिक म्हणून त्यांनी याबाबत अन्न व औषध प्रशासनाच्या टोल-फ्री क्रमांकावर तक्रार नोंदवून संबंधित डॉक्टरांविरुद्ध चौकशी करून योग्य कारवाई करण्याची मागणी केली होती. काही दिवसानंतर त्या खाजगी रुग्णालयात अन्न व औषध प्रशासनाचे पथक दाखल झाले. मात्र कोणतीही चौकशी किंवा कारवाई न करता, केवळ डॉक्टरच्या कॅबिन बाहेर आणि रुग्णालयाशी निगडित असलेल्या मेडिकलवर 'या रुग्णालयात कोणत्याही मेडिकल मधून औषध घेण्याची सक्ती केली जात नाही'. असे कागदाचे फलक लावून निघून गेले. मात्र त्यानंतर अन्न औषध प्रशासन पथकातील एका मोरक्याने देवाण घेवाणसाठी त्या रुग्णालयात 'गिरक्या' मारल्याची चर्चा आता सर्वत्र होत आहे. त्यामुळे अन्न व औषध प्रशासनाकडे आलेल्या त्या तक्रारीची वरिष्ठांनी चौकशी करून रुग्णांची लूट करणाऱ्या त्या रुग्णालयावर आणि तक्रार दडपणाऱ्या अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी तक्रारदाराने केली आहे. मात्र आता तरी अन्न व औषध प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी त्या तक्रारीची गंभीर दखल घेणार का हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

आयुक्त तुकाराम मुंढे हे शिस्त, कडक, नियम व कायद्यासाठी प्रसिध्द आहेत. ज्या विभागात गेले त्या विभागात ते कायद्याने काम करून सर्वसामान्यांचा फायदा करतात मात्र, अकोला - वाशीम जिल्ह्यात त्यांच्या याच गोष्टीचा फायदा घेत भ्रष्टअधिकाऱ्यांनी कारवाईच्या नावाखाली छोट्या दुकानदारांकडून लूट सुरू केली आहे. यासाठी दलालही नेमले आहेत. अकोला - वाशीम जिल्ह्यात अन्न व प्रशासन विभागाने एकही ठोस मोठी कारवाई न करता निव्वळ वसुलीचाच धंदा सुरू केला आहे. राज्यभरातील तुकाराम मुंढे यांच्या कारवायामुळे माफियांनी धास्ती घेतली असून अनेकांची मस्ती उतरली आहे. याच गोष्टीचा फायदा घेत औषध प्रशासन विभागाचा मोरक्या दलालामार्फत वसुलीसाठी बुलढाणा व वाशीम जिल्ह्यात गिरक्या घालत आहे.

## थोडक्यात

### सुमित जमधाडे यांना राज्यस्तरीय कर्तव्यदक्ष पुरस्कार



● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

संकल्प संकल्प बहुद्देशीय संस्था, पारस ग्रामीण युवा बहुउद्देशीय संस्था तुलंगा विध्यार्थी हक्क कृती समिती महाराष्ट्र राज्य वाशिम जिल्हा अध्यक्ष सुमित मधुकर जमधाडे यांना नुकतेच शेगाव येथील द्वारका लॉन्स याठिकाणी राज्यस्तरीय कर्तव्यदक्ष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. संकल्प बहुद्देशीय संस्था अकोला व ग्रामीण युवा बहादेशीय संस्था तुलंगा यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय कर्तव्यदक्ष पुरस्कार वितरण सोहळ्यात हा पुरस्कार सुमित जमधाडे यांना प्रा. संजय खडसे उपविभागीय अधिकारी सिंदखेड राजा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. याप्रसंगी गजानन कांबळे नगरसेवक, प्रभाकर शेगोकार, (नगराध्यक्ष शेगाव) आकाश दादा सिरसाट अध्यक्ष सम्राट संघटना, संस्थेचे अध्यक्ष नरेंद्र इंगळे, सचिव प्रतीक्षा वासनिक मॅडम व वाशिम ची पिऊ रीलस्टर इत्यादी मान्यवर उपस्थित होते समाजातील विविध घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी, शैक्षणिक प्रश्न सोडविण्यासाठी आणि सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याची राज्यस्तरावर दखल घेत हा सुमित जमधाडे यांना हा २०२६ वर्षातला दुसरा राज्यस्तरीय पुरस्कार आहे.

विध्यार्थी हक्क कृती समिती महाराष्ट्र राज्य वाशिम जिल्हा अध्यक्ष सुमित जमधाडे यांच्यावर पुरस्कार आणि, अभिनंदनाचा पाऊस पडताना दिसतोय..समाजहिताची जाणीव ठेवून शिक्षण, विद्यार्थी हक्क, सामाजिक जनजागृती आणि युवकांच्या सक्षमीकरणासाठी सातत्याने कार्य करणारे विद्यार्थी हक्क कृती समितीचे सुमित जमधाडे यांना यंदाचा प्रतिष्ठेचा 'कर्तव्यदक्ष राज्यस्तरीय पुरस्कार' सन्मानित . सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत हा सन्मान पुरस्कार देण्यात आल्याने रिसोडसह संपूर्ण वाशिम जिल्ह्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## भगवंता, काय लावली चिंता, पाऊस येवू दे..!

# पावसासाठी भगवंताकडे साकडे!

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

**धोंडी धोंडी पाणी दे..**
**हलकी हलकी ज्वारी दे..**
**धोंडीचं पाणी मोठ हिवसं..**
**भगवंता काय लावली चिंता**
**पाऊस येवू दे..!**



पावसाने जिल्ह्यात हजेरी लावली त्यानंतर शेतकऱ्यांनी छातीला माती लावून पेरण्या केल्या मात्र, आता आठ दिवसापासून पावसाने दडी मारल्यामुळे जिल्ह्यातील बळीराजा चिंतातूर झाला आहे. पावसासाठी बळीराजाने भगवंताकडे साकडे घालायला सुरूवात केली आहे.

यावर्षी जिल्ह्यातील काही भागात रोहिणी नक्षत्रात अवकाळी पाऊस आला होता. त्यामुळे गत वर्षी प्रमाणे याही वर्षी मृगनक्षत्रात पावसाच्या सरी येतील. या अपेक्षेने शेतकऱ्यांनी पेरणी पूर्वीचे सर्व कामे पुर्ण करुन घेतली. जिल्ह्यामध्ये बियाणे व रासायणिक खताची टंचाई असतांना देखील शेतकऱ्यांनी आर्थिक तडजोड करुन पेरणी साठी अव्वाच्या सव्वा भावात बियाणे व रासायनिक खताची खरेदी केली. मात्र पावसाने शेतकऱ्यांच्या स्वप्नावर पाणी फिरविले. मृग नक्षत्र कोरडाच गेला त्यानंतर आलेल्या पावसाने शेतकऱ्यांनी पेरणी केली. मात्र, पुन्हा पावसाने दडी मारल्यामुळे पावसासाठी शेतकऱ्यांनी भगवंताकडे साकडे घातले आहे. त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त आहेत. त्यामुळे आता " ये रे ये रे पावसा तुला देतो पैसा" अशी पावसालाही आमिष दाखविण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.



धोंडी धोंडी पाणी दे..!

## वन्य प्राण्यांमुळे पीक नुकसान शेतकरी वंचित

● सिटी न्युज ब्युरो @ मेडशी ●

मेडशी वनपरिक्षेत्रातील मागील वर्षी तूर पिकाचे वन्य प्राण्यापासून झालेल्या नुकसान भरपाई पासून परिसरातील शेतकरी अद्यापही वंचित असून यावर्षी पुन्हा रब्बीची पेरणी झाली असून त्यामध्ये सोयाबीन व तूर पिकाचा प्रामुख्याने समावेश आहे विशेष म्हणजे पेरणी



केल्यानंतरच रान डुक्कर शेतांना उद्ध्वस्त करण्यास सुरुवात केली. मात्र मागील नुकसान भरपाई अद्यापही मिळाली नसल्यामुळे यावर्षी नुकसान भरपाईचा अर्ज करावा किंवा नाही करावा या संभ्रमात परिसरातील शेतकरी अटकला आहे. कारण अर्ज करण्याकरिता नुकसान झाल्यापासून दोन दिवसांची मुदत असते मात्र नुकसान भरपाई मिळण्याकरिता सहा ते सात महिन्याचा कालावधी उलटून सुद्धा शेतकरी वंचित आहेत. ज्यामुळे मागच्या वर्षीचे नुकसान भरपाईचे पैसे मिळाले नसल्यामुळे यावर्षी सुद्धा अर्ज करण्याचा खर्च नाहक वाया जाईल या भीतीपोटी शेतकरी चिंताग्रस्त झाले. एकीकडे वन्य प्राणी शेतीतील नव्याने पेरलेल्या पिकाचे झपाट्याने व मर्यादेपेक्षा जास्त प्रमाणात नुकसान करण्यास सुरुवात केली. अद्याप तर पीक निघण्यास खूप वेळ आहे. त्यामुळे पेरलेले पिके हे शेवटपर्यंत राहतील किंवा नाही याची शेतकऱ्यांना शाश्वती नाही. यावर्षी अल् निनोचा प्रादुर्भावामुळे व दुसरीकडे बोगस बियाणामुळे शेतकरी पुरता हतबल झाला असल्यामुळे आता या वन्य प्राण्याच्या नुकसानापासून पिकांना व शेतकऱ्यांना कोण वाचवेल असा प्रश्न परिसरातील शेतकऱ्यांपुढे उभा आहे. मागील वर्षाचे वन्य प्राणी नुकसान भरपाईचे पैसे तातडीने देण्यात यावे.

## पिके वाचवण्यासाठी 'जुगाड', रात्र जागून काढण्याची आली वेळ...

# वन्यप्राण्यांच्या हैदोसाने शेतकरी हवालदिल!

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

यंदाच्या हंगामात निसर्गाने लेट पण थेट अशी सुरुवातीलाच दमदार हजेरी लावल्याने बळीराजा सुखावला आहे. बळशेतीची शिदोरी मोठ्या कष्टापोटी शेतकरी शेतात राबत असून बळीराजा शेतक-यांनी कापूस, सोयाबीन, तूर यांसारख्या पिकांची पेरणी केली आहे. पिके जामात आली असतानाच गेल्या अनेक वर्षापासून जंगली प्राण्यांच्या वाढत्या हैदोसाने शेतक-याच्या हाती येण्याच्या आधीच घास हिकाऊन जाण्याची भीती निर्मित झाली आहे.



जंगली प्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी शेतकरी आपापल्या परीने तात्पुरते उपाय करत आहेत. कोणी शेतामधील काटेरी तार लावत आहे, तर कोणी झाडाच्या माशी यापास करत आहे. आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने शेतकरी साहित्य, दोर, स्मोकिंग पाण्याने पिकांचे नुकसान होऊ नये म्हणून शेताच्या बांधावर बनावट माणसे पुतळे लावण्याचा केविलवाणा प्रयत्न करत आहेत. या वास्तव्यामुळे उपाययोजनामुळे जंगली




प्राण्यांचा त्रास कमी होत नसल्याचे चित्र आहे. अनेकदा हे वन्यप्राणी रात्री वेळी शेतात घुसून उभ्या पिकांची मोठ्या प्रमाणावर नासाडी करतात. त्यामुळे पिकांचे रक्षण करण्यासाठी शेतक-यांना भरपावसात आणि थंडीत संपूर्ण रात्र शेतात जागून काढावी लागत आहे. दिवसभर शेतात कष्ट करायचे आणि रात्री पिकांची राखण करायची, अशा दुहेरी संकटामुळे शेतकरी शारीरिक व मानसिकदृष्ट्या खचला आहे. शेतामधील लावलेल्या तारांमुळे पिकांची कापणी करतानाही शेतक-यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. शेतक-यांनी एवढी मेहनत करूनही वन्यप्राणी काही बेताजात संपूर्ण पीक फस्त करत जातात. यामुळे शेतकरी वर्ग पूर्णपणे हवालदिल झाला आहे.

वन्यप्राण्यांच्या नुकसानासाठी कायदापत्राची पूर्तता केल्यानंतर मिळणारी तुटपुंजी मदत म्हणजे 'भूत नये पण कुत्रा आवर' अशी शेतक-यांची अवस्था झाली आहे. केवळ तात्पुरत्या उपायावर विसंबून न राहता शासनाने आणि वनविभागाने या समस्येवर गंभीर लक्ष द्यावे.

## ऊन-सावलीचा खेळ, अन् सोसाट्याचा वारा...

# पेरणी झालेले शेतकरी हवालदिल; दुबार पेरणीचे संकट!

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

यावर्षी समाधान कारक पाऊस होईल असे सांगितले जात होते. प्रारंभीच्या काळात चांगला पाऊस झाला देखील, परंतु आता घोटा चिखली, परिसरातील पचास टक्के क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाल्यानंतर पावसाने दडी मारली आहे. कमी अधिक प्रमाणात तालुक्यात सर्वत्र हीच परिस्थिती असून येत्या आठ दिवसात दमदार पाऊस न झाल्यास शेतकऱ्यांसमोर दुबार पेरणीचे संकट उभे राहू शकते. शेतकऱ्यांची उसनवारी, व्याजाने पैसे काढून खरीपाच्या पिकाची लागवड व पेरणी पूर्ण केली.

गत चार वर्षे पाऊस निराशाजनक दुष्ट चक्रांनी बळीराजाला आढळलेला पाहिला आहे. यावर्षी तरी निसर्ग आपली अनुकूलता दाखवणार नाही असे वाटत होते. मात्र याहीवर्षी अवकृपा



दाखवण्यास सुरुवात केली असून महागामोलाचे बियाणे मातीनंत जात आहे. पावसाने दडी मारल्याने नयके सुकू लागली आहेत. सध्या नुसत ऊन सावलीचा खेळ अन् सोसाट्याचा वारा सुरू आहे. यामुळे शेतकऱ्यांची काळजी फाटत आहे. गत आठ दिवसांपासून पाऊस पडला नसल्यामुळे कोमेजलेले पिके सुकू लागली आहे. यामुळे टाकरवण सह परिसरातील शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे असमानी संकट उभे राहते की काय, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

**रसशोषक किडींचा प्रादुर्भाव वाढल्याने चिंता...**

यावर्षी खरीप हंगामामध्ये उशिरा पावसाने संततधार हजेरी लावल्यानंतर त्यावेळेस बळीराजांनी आपल्या खरीपाच्या पेरण्या केल्या. परंतु सध्या गेल्या आठ दिवसांपासून पावसाने दडी मारली त्याचच आता खरीप हंगामातील उगवलेल्या पिकांवर सध्या रस शोषक किडींचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे दिसून येत असल्यामुळे शेतकरी वर्गामध्ये पुन्हा एकदा चिंतेचे वातावरण निर्माण होत आहे.

**वीज नाही, पाणी नाही, नदी नाले कोरडे...**

संपूर्ण जून महिना ओला परंतु हा महिन्यात एकही जोरदार पाऊस न झाल्यामुळे घोटा, चिखली सह परिसरातील नदी नाले अजूनही कोरडे ठाक आहे. त्यातच गत आठ दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने पिके कोमेजली जात आहे. त्यातच वीज पुरवठ्यामध्ये सातत्याने बिघाड होत असल्यामुळे शेतकऱ्यांपुढे पुन्हा एकदा नवीन संकट उभा राहत आहे.

# मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेला वेग!

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात सुरू असलेल्या विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेला गती मिळत असून, विविध यादी भागांमध्ये गणना प्रपत्रांचे संकलन, मतदार पडताळणी आणि माहितीचे संगणकीकरण नियोजनबद्ध पद्धतीने सुरू आहे. या मोहिमेत मालेगाव तालुक्यातील किन्ही घोडमोड येथील यादी भाग क्रमांक १६९ तसेच कारंजा तालुक्यातील येवता येथील यादी भाग क्रमांक ९८ मधील काम यशस्वीरित्या पूर्ण झाले आहे.

मतदारांची गणना प्रपत्रे भरून माहितीचे शंभर टक्के संगणकीकरण पूर्ण करण्यात आले आहे. या अनुषंगाने विशेष सखोल मतदार



यादी पुनरीक्षण मोहिमेत उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल मालेगाव तालुक्यातील घोडकिन्ही येथील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) संजय सुरेकर तसेच कारंजा तालुक्यातील येवता येथील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) संतोष ढोणे यांचा जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी विरेंद्र जाधव, जिल्हा माहिती अधिकारी श्वेता पोटुडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी योगेश कुंभेजकर म्हणाले, विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण मोहीम ही लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. या मोहिमेच्या यशात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, त्यांनी घराघरात जाऊन मतदारांची अचूक माहिती संकलित करावी. प्रत्येक पात्र मतदाराचे नाव मतदार यादीत समाविष्ट होईल आणि मतदार यादी अद्ययावत व त्रुटीमुक्त राहील, यासाठी काटेकोरपणे काम करण्याची आवश्यकता आहे. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बीएलओंचा सन्मान हा इतरांसाठीही प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# मातंगवाडीतील तीन घरांवर चालला शेगाव नगरपालिकेचा 'बुलडोझर'!

## विस्थापित दुकानदारांचा कारवाई थांबविण्याचा प्रयत्नः लॉटरी पद्धतीने दुकाने वाटपास विरोध!

प्रतिनिधी १४ जुलै

**शेगाव :** नगरपरिषदेने नव्याने बांधलेल्या दुकानांच्या वाटपावरून शेगावात वाद चिघळला आहे. सोमवारी पालिकेच्या कारवाईला महिलांसह दुकानदारांनी ठिय्या आंदोलन करून विरोध केला. दरम्यान, सायंकाळी नगरपालिकेने दुकानांमागील तीन घरांवर बुलडोझरद्वारे कारवाई केली.



खामगावात दि. १ जून रोजी उपविभागीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत प्रत्येक विस्थापित दुकानदाराला पसंतीनुसार दुकान देण्याचे आश्वासन देण्यात आल्याचा दावा दुकानदारांनी केला आहे; मात्र त्यानंतर अचानक लॉटरी पद्धतीने दुकानांचे वाटप करण्याचा निर्णय का घेण्यात आला, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. ११ जुलै रोजी मुख्याधिकारी जयश्री काटकर-बोराडे यांनी दुकानांचे वाटप लॉटरी पद्धतीनेच होईल, असे स्पष्ट केल्यानंतर दुकानदारांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली. १ जून रोजी झालेल्या बैठकीतील निर्णय चुकीचा होता का, याबाबत प्रशासनाने लेखी खुलासा करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, मातंगवाडीतील जागा रिकामी करण्यासाठी देण्यात आलेली १३ जुलैची मुदत संपली आहे. निर्धारित मुदतीत कारवाई न झाल्याबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नगरपालिकेला फटकारल्याची माहिती समोर आली आहे.

२५ ते ३० महिलांनी मालकी हक्काचे दुकान मिळेपर्यंत ठिय्या देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. लहान मुलांसह महिलांनी मुख्य रस्त्यावर घोषणाबाजी करत रस्ता रोखला. यावेळी सर्व दुकानदार उपस्थित होते. या कारवाईआधी दुकाने व घरांचा वीज पुरवठा बंद करण्यात आला होता. यापुढे काय कारवाई होते, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### कलम 163 लागू

परिस्थिती तणावपूर्ण झाल्याने संत गाडगेबाबा चौक, मातंगपुरा, मंदिर परिसरासह ८ ठिकाणी भारतीय नागरी सुरक्षा संहितेअंतर्गत कलम १६३ लागू करण्यात आले.

### मंदिर परिसरात बंदोबस्त!

जागा ताब्यात ६ जेसीबी, ५ ट्रॅक्टर, २ मोबाइल व्हॅन आणि अधिकाऱ्यांच्या ६ वाहनांचा ताफा तैनात करण्यात आला होता. तसेच नगरपालिकेचे ४० ते ५० कर्मचारी, दंगा काबू पथक, अतिरिक्त पोलिस कर्मचारी परिसरात तैनात होते

# जुन्या जन्म-मृत्यू नोंदींच्या डिजिटायझेशनबाबत सूचना

## सीआरएस पोर्टलद्वारे प्रमाणपत्र वितरण प्रक्रिया बळकटीसाठी संबंधित कार्यालयांना निर्देश

प्रतिनिधी १४ जुलै

**सिंदखेडराजा :** जिल्ह्यातील जुन्या जन्म व मृत्यू नोंदींचे सीआरएस (Civil Registration System) पोर्टलद्वारे डिजिटायझेशन करून प्रमाणपत्र वितरणाची प्रक्रिया अधिक सक्षम करण्याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक (जन्म-मृत्यू), जिल्हा परिषद बुलढाणा यांनी संबंधित कार्यालयांना निर्देश दिले आहेत.

१ जुलै रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक (जन्म-मृत्यू) डॉ. रंजीत रामदास मंडाले यांनी जिल्हा शल्य चिकित्सक, वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालये, तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी, गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी तसेच नगरपरिषद व नगरपंचायतींच्या मुख्याधिकाऱ्यांना याबाबत पत्र पाठविले आहे. पत्रानुसार, केंद्र शासनाने २४ जून २०२४ रोजी सुधारित सीआरएस पोर्टल कार्यान्वित केले आहे. यापूर्वी हाताने नोंदविलेल्या

तसेच संग्राम, ई-ग्रामसॉफ्ट, सर्व्हिस प्लस, केडीएमसी, श्र्हा, SAP आदी माध्यमांतून नोंदविण्यात आलेल्या जन्म व मृत्यू घटनांचे 'ADD OLD BIRTH EVENT' व 'ADD OLD DEATH EVENT' या सुविधेद्वारे डिजिटायझेशन करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. जुन्या जन्म व मृत्यू नोंदींच्या डिजिटायझेशनसाठी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सीआरएस पोर्टलवर सादर करावेत. मूळ अभिलेखातील माहिती व पोर्टलवरील माहितीमध्ये तफावत नसावी.

माहिती चुकीची आढळल्यास किंवा खाडाखोड केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित अर्ज रद्द करण्यात येईल, असे पत्रात नमूद करण्यात आले आहे. तसेच जुन्या जन्म व मृत्यू नोंदींचे डिजिटायझेशन, विलंबित नोंदीसंदर्भातील कार्यपद्धती, आवश्यक कागदपत्रे आणि प्रक्रियेदरम्यान येणाऱ्या अडचणींबाबत लेखी स्वरूपात जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयास कळविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

# प्रतिबंधित तंबाखू जप्त; एकाला अटक

## नांदुरा पोलिसांची कारवाई : आरोपीवर गुन्हा दाखल

प्रतिनिधी १४ जुलै

**खामगाव:** प्रतिबंधित सुगंधी तंबाखू व पान मसाल्याची अवैध वाहतूक करणाऱ्या एका व्यक्तीला नांदुरा पोलिसांनी निमगाव फाटा परिसरातून अटक केली. यावेळी आरोपीकडून दुचाकी, मोबाइल आणि प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थासह एकूण ७९ हजार ९३२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नांदुरा पोलिस ठाण्याचे बीट जमादार गजानन इंगळे, पोलिस कर्मचारी संजय वराळे व गणेश नागरे हे १२ जुलै रोजी सकाळी निमगाव फाटा परिसरात गस्त घालत होते. यावेळी दुचाकी क्रमांक (एमएच २८ बीएक्स ०८२०) वरील एका व्यक्तीच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पोलिसांनी वाहनाची तपासणी केली. या तपासणीत दुचाकीवरील पिशवीत प्रतिबंधित सुगंधी तंबाखू, केसरयुक्त पानमसाल्याचा साठा आढळून आला. याच्याविरुद्ध याबाबत अन्न सुरक्षा अधिकारी गुलाबसिंग वसावे यांना घटनास्थळी पाचारण करण्यात आले. त्यांनी तपासणी केल्यानंतर संबंधित अन्नपदार्थ प्रतिबंधित असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर महादेव गुलाबराव पुंडकर (वय ४२, रा. शिवशंकर नगर, नांदुरा) नांदुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईदरम्यान पोलिसांनी ६० हजार रुपये किमतीची दुचाकी, १० हजार रुपयांचा मोबाइल व ९ हजार ९३२ रुपयांचा प्रतिबंधित अन्नपदार्थ, असा एकूण ७९ हजार ९३२ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक चव्हाण करत आहेत.

# रेतीची अवैध वाहतूक; टिप्पर जप्त, चालकाविरुद्ध गुन्हा दाखल!

## नांदुरा पोलिसांची कारवाई : दोन ब्रास रेती ताब्यात

प्रतिनिधी १४ जुलै

**नांदुरा:** रेतीची अवैध वाहतूक करताना पोलिसांनी टिप्पर जप्त करून चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला. ही कारवाई १२ जुलै रोजी रात्री उशिरा शहरातील एका पेट्रोल पंप परिसरात करण्यात आली.

या प्रकरणी पोलिस स्टेशन नांदुरा येथे भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) तसेच गौण खनिज कायदा मधील कलम २१ (१) व २१ (२) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रेतीची अवैध वाहतूक रोखण्यासाठी गस्त घालत असताना आरोपी प्रफुल परमेश्वर वाघ (रा. पलसोडा, ता. नांदुरा) हा टिप्पर वाहन क्रमांक एम. एच. २८ बीबी ९९१२ द्वारे विनापरवाना रेतीची वाहतूक करताना आढळून आला. यानंतर पोलिसांनी कारवाई करून आरोपीला ताब्यात घेतले. या कारवाई दरम्यान सुमारे ६ हजार रुपये किमतीची दोन ब्रास रेती तसेच १० लाख रुपये किमतीचा टिप्पर असा १० लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

# जागेच्या वादातून महिलेला मारहाण; तिघांवर गुन्हा दाखल

## गौलखेड येथील घटना : शिवीगाळ केल्याचा आरोप

प्रतिनिधी १४ जुलै

**शेगाव:** तालुक्यातील गौलखेड येथे जागेच्या वादातून एका महिलेला मारहाण केल्याची घटना समोर आली असून, या प्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १२ जुलै रोजी रात्री सुमारे १०:३० वाजता घडली. या प्रकरणी लता सुभाष शेजोळे (वय ५५, रा. गौलखेड, ता. शेगाव) यांनी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार, ते व आरोपी हे एकमेकांचे नातेवाईक असून, त्यांच्यात जागेच्या कारणावरून वाद सुरू आहे. संबंधित जागेवर फिर्यादीचे बांधकाम सुरू आहे. घटनेच्या दिवशी त्या जागेवर गेल्या असता बांधकामातील विटा व दगडांवर मोठे दगड टाकलेले दिसून आले. याबाबत विचारणा करत असताना देवमन महादेव शेजोळे यांनी फिर्यादी चे केस पकडून त्यांचे डोके दगडावर आपटले, ज्यामुळे त्यांच्या कपाळावर जखम होऊन रक्तस्राव झाला, तसेच आरोपी विठ्ठल पांडुरंग शेजोळे यांनी मारहाण करून शिवीगाळ केली. यावेळी दोन अज्ञात व्यक्तींनी ही फिर्यादीला मारहाण केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी शेगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता अंतर्गत कलम ११८ (१), ११५ (२), ३५२ व ३ (५) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# मद्यधुंद दुचाकी चालकांवर कारवाई

प्रतिनिधी १४ जुलै

**खामगाव:** शहरात दारूच्या नशेत भरधाव दुचाकी चालवून स्वतःसह इतरांच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्या दोन वाहनचालकाविरुद्ध खामगाव शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केल आहे.

पहिल्या कारवाईत पोलिस अंमलदार रमेश महादेव काकड हे वरिष्ठांच्या आदेशानुसार, १८ जुलै रोजी पथकासह केडिया टर्निंग परिसरात नियमित गस्तीवर होते. यावेळी एमएच १२ एफड़ ४१४६ क्रमांकाची दुचाकी धोकादायक पद्धतीने चालविली जात असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. संशय आल्याने पोलिसांनी वाहन अडविले चौकशीदरम्यान चालकाच्या हालचाल संशयास्पद वाटल्याने त्याची पंचांसमक्ष प्राथमिक पडताळणी करण्यात आली. त्यानंतर त्याल खामगाव येथील सामान्य रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी नेण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी संबंधित व्यक्तीने मद्यसेवन केल्याचा अभिप्राय दिल्यानंतर पोलिसांन त्याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई केली आरोपीचे नाव कपिल हरिदास इंगळे (४३, रा भीमनगर वाडी, ता. खामगाव, जि. बुलढाणा) असे आहे. या प्रकरणी तक्रारीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलिस अंमलदार राहुल इंगळे करीत आहेत. त दुसऱ्या कारवाईत शर्मा टर्निंग जवळ सुधाकर रामचंद्र गवारगुरू (रा. वरखेड खुर्द, ता. शेगाव याच्याविरुद्ध कारवाई करून गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलिस अंमलदान सचिन वानखेडे करीत आहेत.

# वरली मटका जुगारावर पोलिसांची कारवाई; एकावर गुन्हा दाखल

प्रतिनिधी १४ जुलै

**मलकापूर :** शहर पोलिसांनी तहसील चौक परिसरात सुरू असलेल्या वरळी मटका जुगारावर कारवाई करत एका व्यक्तीविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत रोख रक्कम व जुगाराचे साहित्य असा एकूण ३१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

मलकापूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार संतोष त्र्यंबक कुमावत यांनी मिळालेल्या माहितीच्या आधारे सोमवारी (दि. १३) सायंकाळी ४.४५ वाजताच्या सुमारास तहसील चौकातील लकीराज मेडिकलजवळ पंचांसमक्ष धाड टाकली. या कारवाईदरम्यान प्रल्हाद सुखदेव सातव (वय ६०, रा. दाताळा, ता. मलकापूर) हा सार्वजनिक ठिकाणी वरळी मटका जुगार चालवित असल्याचे निदर्शनास आले. झडतीदरम्यान आरोपीच्या ताब्यातून ३१० रुपये रोख, वरळी मटक्याचे आकडे लिहिलेली चिठ्ठी व एक डॉट पेन असा जुगाराशी संबंधित मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यानंतर आरोपीविरुद्ध मलकापूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५१९/२०२६ दाखल करण्यात आला असून महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यातील कलम १२(अ) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास सहाय्यक फौजदार संजय निंबोळकर करीत असून, वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

# 'प्रतिपंढरपूर' वैष्णवगडसाठी एसटी बससेवा सुरु करा!

## संस्थानची विभाग नियंत्रकांकडे मागणी

प्रतिनिधी १४ जुलै

**सिंदखेडराजा :** तालुक्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र व 'प्रतिपंढरपूर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र वैष्णवगड येथे दर्शनासाठी येणाऱ्या हजारो भाविकांची आणि परिसरातील ग्रामस्थांची वाहतुकीची गैरसोय दूर करण्यासाठी तातडीने एसटी बस सेवा सुरू करण्यात यावी, अशी मागणी 'ह. भ. प. गुरुवर्य त्र्यंबक पं. सानप (गुरुजी) बहुउद्देशीय संस्था, देऊळगाव राजा' यांच्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भात संस्थेने बुलढाणा विभागाचे विभाग नियंत्रक यांना लेखी निवेदन दिले.

श्री क्षेत्र वैष्णवगड (ता. सिंदखेड राजा, जि. बुलढाणा) हे ठिकाण प्रतिपंढरपूर असून, येथे दररोज आणि विशेषतः प्रत्येक एकादशीला श्री रुक्मिणी-पांडुरंगाच्या दर्शनासाठी हजारो भाविक मोठ्या संख्येने येतात. मात्र, योग्य बस सेवा उपलब्ध नसल्याने भाविकांसह स्थानिक नागरिकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे सिंदखेडराजा वैष्णवगड -साठेगाव - सिं. राजा या मार्गावर धावणारी बस सेवा सध्या बंद असून ती नियमित सुरू करण्यात यावी.

सिं. राजा वैष्णवगड- दे. मही बुलढाणा ही नवीन बस सेवा तातडीने सुरू करावी, जेणेकरून जिल्हा मुख्यालयात जाणाऱ्या लोकांची सोय होईल.

या दोन्ही गाड्या नियमित सुरू केल्यास दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची आणि परिसरातील प्रवाशांची मोठी सोय होणार आहे. या मागणीचे गांभीर्य लक्षात घेऊन या पत्राची एक प्रत सिंदखेड राजा मतदारसंघाचे आमदार मनोजभाऊ कायंदे यांनाही माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठवण्यात आली आहे. सदर निवेदनावर संस्थेचे सचिव सुखदेव रामभाऊ ताठे यांच्या स्वाक्षरीसह ह.भ.प. गुरुवर्य त्र्यंबक पं. सानप (गुरुजी) बहुउद्देशीय संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मतदार पडताळणीचे 93.76 टक्के फॉर्म वाटप पूर्ण

## एसआयआर मोहिमेचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

प्रतिनिधी १४ जुलै

**चिखली :** जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. प्रवीण देवरे यांनी सोमवारी सकाळी ११.३० वाजता चिखली तहसील कार्यालयाला भेट देऊन चिखली विधानसभा मतदारसंघात सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाचा आढावा घेतला. यावेळी मतदार पडताळणीसाठी नियुक्त क्षेत्रीय अधिकारी, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी आणि मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांच्या कामकाजाची सविस्तर समीक्षा करण्यात आली.

१२ जुलै अखेरच्या अहवालानुसार, २३ चिखली विधानसभा मतदारसंघातील एकूण ३ लाख १ हजार ७२० मतदारांपैकी २ लाख ८२ हजार ८८५ गणनापत्रांचे (EF Form) वाटप पूर्ण झाले असून, ही प्रगती ९३.७६ टक्के इतकी आहे. तसेच ७१ हजार ७६ गणनापत्रांचे ऑनलाइन डिजिटायझेशन पूर्ण झाले असून त्याचे प्रमाण २३.५६ टक्के आहे. आढावा बैठकीत ज्या केंद्रस्तरीय मतदान अधिकाऱ्यांकडील कामाचा वेग अपेक्षेपेक्षा कमी आहे, त्या ठिकाणी विशेष लक्ष देण्याचे निर्देश देण्यात आले. भारत निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या कालमर्यादेत उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना करण्यात आल्या. दरम्यान, मतदार यादीच्या भाग क्रमांक २७७ (पळसखेड दौलत) येथे विशेष सखोल पुनरिक्षणाचे काम शंभर टक्के पूर्ण झाल्याबद्दल जिल्हाधिकारी डॉक्टर प्रवीण देवरे यांच्या हस्ते मतदान केंद्रस्तरीय अधिकारी योगेश काशिनाथ पाटील (BLO), पर्यवेक्षक संजय चौधरी आणि सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी राजेश वाघ यांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

# अंकुरलेली पिके टाकत आहे माना

## पावसाची दडी अन् पिकांची नासाडी धोंडी धोंडी पाणी दे म्हणण्याची वेळ

प्रतिनिधी १४ जुलै

**पातुर्डा :** जून महिन्याच्या अखेरीस झालेल्या पावसानंतर शेतकऱ्यांनी मोठ्या उत्साहात पेरण्या उरकल्या. मात्र, गेल्या काही दिवसांपासून पावसाने पूर्णपणे दडी मारल्यामुळे ग्रामीण भागात चिंतेचे वातावरण आहे. कडक ऊन आणि पाण्याचा अभाव यामुळे शेतातील कोवळी पिके आता करपू लागली असून, शेतकऱ्यांचे डोळे पुन्हा एकदा आभाळाकडे लागले आहेत.



शेतकऱ्यांनी सोयाबीन, कापूस, आणि तूर या पिकांची मोठ्या प्रमाणावर पेरणी केली आहे. सुरुवातीला अंकुरलेली पिके आता वाढीच्या अवस्थेत आहेत. परंतु, ऐन गरजेच्या वेळी पाऊस गायब झाल्याने जमिनीला भेगा पडू लागल्या आहेत. पाण्याच्या कमतरतेमुळे पिवळी पडून पिके कोमेजू लागली आहेत.

महागडे बियाणे, खते आणि मशागतीचा खर्च करून शेतकऱ्यांनी पेरणी केली होती. जर पुढील काही दिवसांत पाऊस आला नाही, तर ही पिके पूर्णपणे सुकून नुकसान होण्याची भीती आहे. अशी परिस्थिती निर्माण झाल्यास शेतकऱ्यांवर 'दुबार पेरणी' करण्याचे संकट ओढवू शकते. आधीच कर्जाच्या खाईत असलेल्या शेतकऱ्याला दुबार पेरणीचा खर्च परवडणारा नसल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. धोंडी धोंडी पाणी दे म्हणण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. पावसाळा लांबल्याने शेतकऱ्यांना उशिरा पेरण्या कराव्या लागल्या. त्यातही आता पावसाने दडी मारल्याने अंकुरलेल्या पिकांची नासाडी होण्याची भीती व्यक्त होत आहे.

# पानलोट सेफ झोनमध्ये 64 गावांचा समावेश!

## जीएसडीए अहवालाने वाढली आशा

प्रतिनिधी १४ जुलै

**सोनाळा :** भुजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणा बुलढाणा यांचा सन २०२६ -२७ च्या वॉटर ऑडीट अहवाल नुकताच समोर आला आहे. या अहवालानुसार खारपानपट्ट्यात भूजल पातळी सुधारल्याने सेफ झोन म्हणजे 'सुरक्षित पाणलोट क्षेत्र गावांची संख्या वाढली आहे. त्यामुळे आता संग्रामपूर तालुक्यात ६४ गावांचा सुरक्षीत पानलोटमध्ये समावेश झाला आहे.

ही गावे पूर्वी शोषित व अंशतःशोषित वर्गवारीत होती. त्यामुळे पाणी उपसा करण्यासाठी प्रतिबंधीत ६४ पानलोट व गावे आता अतिशोषीत वर्गवारीतून आऊट झाले आहेत. वरिष्ठ भुवैज्ञानिक भुजल सर्वेक्षण आणि विकास संस्था बुलढाणा यांनी तालुका कृषी विभाग व पंचायत समिती कृषी विभागाला याबाबत अवगत केले आहे भूगर्भात झालेला हा लक्षणीय बदल निसर्गाच्या लहरीपणावर शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या जीवनात आशेचा किरण जागवणारा ठरतो आहे. संग्रामपूर हा सातपुडा माथा ते पूर्णा खोरा पायथा या दरम्यान वसलेला खारपानपट्टयाचा तालुका आहे . या तालुक्यात जेमतेम ३० टक्के बागायती शेती आहे. मात्र अपूरा जलस्त्रोत असत्याने बारमाही पिका खाली बागायत जमिन नाही. असे असतांना भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांनी भुजल मुल्यांकन सन २२ नुसार संग्रामपूर तालुका हा अतिशोषीत वर्गवारीत समविष्ठ केला होता. मोठा पाणी उपसा होत असल्याने पाणी पातळी खोल गेली आहे. परिणामी शेतकऱ्यांना शासकीय सिंचनाच्या योजना, विहिरी खोदण्यास व कृषी योजनेचा शासकीय लाभघेण्यापासून बाद ठरविले होते. आता मात्र ९९ पैकी ६४ पानलोट व गाव हे सुरक्षित पानलोट क्षेत्र, असल्याचे अहवालात नमूद आहे.

आता सुरक्षित वर्गवारीतील समाविष्ट गावांची नावे आस्वद, आवार, कोद्री, कुंदेगाव, पिंप्री अडगाव, टाकळी पंच, उकळी बु, दुर्गादैत्य, जस्तगाव, खिरोडा, वरवट खंडेराव, अन्यार पानलोट, बल्लाळी, बानोदा बु, बानोदा एकलारा, बावनबीर, भूईखेड, बोरखेड, दानापूर छोटे, देऊळगाव धर्माल, डोंगरखेड, काकनवाडा बु., काकनवाडा खु., कामोद पानलोट, काटेल, काथरमल, खळद बु, खळद खु., खेल, भोंगळ पातुर्डा, खेल दलवी पातुर्डा, खेल माळी पातुर्डा, खेल थोरात पातुर्डा, कोलद, लिंगाई, मनार्डी, मोमीनाबाद, नेकनानपूर पलसोळा, पातुर्डा खू., पिंप्री कवठळ, पिंगळी बु., पिंगळी जहाँ रिंगणवाडी, रोहिण खिडकी, सोगोडा, सालबद, सालवन, संग्रामपूर प्रगणे सोनाळा, सावळी, सायखेड, सोनाळा, वडगाव वाण, वांगर, वानखेड, वारखेड, वरवट बकाल, अंबाबरवा, चूनखेडी पानलोट व गावे नव्याने सुरक्षित वर्गवारीत भुजल सर्वेक्षण विभागाने समाविष्ठ केले आहे. आधी ५९ गावे सुरक्षित वर्गवारीत होते. आता एकूण ६४ पानलोट क्षेत्र झाले.














































हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135